# प्रबोधित शिक्षण

## (शालेय मार्गदर्शक)



परमपूज्य श्रीमाताजी निर्मलादेवी

# प्रबोधित शिक्षण

## (शालेय मार्गदर्शक)

(Education Enlightened चा मराठी अनुवाद)

परम पूज्य श्रीमाताजी निर्मलादेवी

# प्रस्तावना

परमपूज्य माताजी श्रीनिर्मलादेवी ह्यांची एक दिव्य आणि सर्वव्यापी दृष्टी आहे. त्यांच्या ह्या दिव्य दूरदृष्टीद्वारेच मनुष्यमात्राच्या सामूहिक उत्थानासाठी त्यांनी एक अद्वितीय शिक्षणप्रणालीची उत्क्रांती केली आहे. आधुनिक काळातील अंदाधुंदीच्या गदारोळातदेखील बालकाचा संतुलित विकास कसा होईल हा या शिक्षणप्रणालीचा विशेष उद्देश आहे. प्राचीन काळातील गुरु-शिष्य परंपरेने मंडित झालेले चिरंतन तत्त्व म्हणजे प्रेम होय. ह्या परंपरेत अध्ययन म्हणजे ईश्वराच्या दिव्य इच्छेचे पालन, त्यासंबंधीच्या नियमांचा आदर आणि ईश्वराच्या विभूतिमत्त्वाचे निरंतर सातत्य ह्या गोष्टींची तयारी केली जात असे. श्रीमाताजींच्या द्रष्टेपणातच ह्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव आहे.

'शिक्षण' ह्याचा शब्दशः अर्थ म्हणजे ज्ञानाचे प्रचलन आणि आदान-प्रदान सहज, स्वाभाविकपणे तसेच उत्स्फूर्तपणे होणे असते. गुरु-शिष्य परंपरेत तसेच होत असे. गुरु मोठ्या प्रेमाने ज्ञान देत असत आणि ज्ञानाचे हे मोती शिष्य मोठ्या कृतज्ञतेने वेचून गोळा करीत असत आणि आत्मसात करीत असत. हे सगळे कार्य म्हणजे माहिती एकाकडून दुसऱ्याकडे पोहोचवणे, एवढेच नव्हते, तर सृष्टीनिर्माता असणाऱ्या परमेश्वराच्या दिशेने सामूहिक उत्थानाचा एक संबंध प्रस्थापित करणे होते. हे नसले तर शिक्षणाला काहीही अर्थ नाही. शिक्षणाचा हा सचेतन घटक आधुनिक शिक्षणात हरवलेला आहे. त्यामुळे ते नीरस, शुष्क आणि पोकळ झालेले आहे. शाळा आणि विश्वविद्यालये मोठमोठ्या शब्दांच्या घोषांनी भले ही पदव्या देवोत; परंतु जिथे आत्म्याची उपेक्षा केली जाते, तिथे व्यक्तिमत्त्व

अपूर्ण आणि असंतुलितच राहते. सुदैवाने श्रीमाताजींच्या आगमनामुळे त्यांनी दिलेल्या सहजयोगाच्या अमूल्य उपहाराच्या प्रकाशात आपले शिक्षण उजळून आलोकित, प्रबोधित झाले आहे.

सहजयोग आमच्यातील गूढ, अदृश्य चेतनेला केवळ पुष्टच करत नाही, तर साक्षात्कारी व्यक्तीच्या रूपात आम्हाला पुनर्जीवित करतो. श्रीमाताजी देत असलेल्या आनंद आणि प्रेमामुळे साक्षात्कारी व्यक्ती दुसऱ्यांचा दीप प्रज्ज्वलित करू शकते.

राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा सर्वतोपरी स्वीकार सहज शिक्षण स्वाभाविकपणे करतेच, परंतु त्याही पलीकडे जाऊन शुद्ध चैतन्याच्या अबोधिततेचे मौल्यवान मंतरलेले दिवस पुनश्च उपभोगण्याची संधीदेखील सहज शिक्षणाने बालकाला मिळावी असे ह्या पद्धतीने निर्माण झालेले चित्र मनश्चक्षूंसमोर उभे करते.

हे एक आगळ्या वेगळ्या पद्धतीचे अध्ययन आहे. बालकाची काळजी अगदी घरातल्यासारखी प्रेमळपणाने घेतली जाऊन त्यामुळेच त्याचे पालनपोषण व्यवस्थितपणे होते. शिवाय त्याला बाहेरच्या जगाच्या वास्तविक गोष्टींमधील सारासार रूपात मार्मिकपणाने ग्रहण करण्यास सुद्धा सज्ज केले जाते. अशाप्रकारे सुज्ञता आणि विवेक उत्पन्न होतो. त्यानंतर वर्गात शिकवलेले पाठ या अध्ययन प्रक्रियेचा एक अखंड अभिन्न अंश होतो. शिकलेला प्रत्येक पाठ हा आनंदपूर्ण अनुभव असतो. त्यामुळे बालकाची जाणीव आणि उत्थान समृद्ध होते.

सहजयोग आत्मसाक्षात्काराचा अनुभव देतो. त्यामुळे आत्मिक आनंदाची अभिव्यक्ती होते. हा आत्मानंद अनेकविध रूपांनी प्रकट केला जातो. त्यातून सौंदर्यानुभूतीचा विकास होतो. ह्या प्रक्रियेतील प्रत्येक घटक

बालकाच्या उत्थानाचा एक अविभाज्य अंश असतो.

पाठशाळेत परस्पर सहजयोगात सामंजस्य असलेला, उच्च पात्रतायुक्त, बुद्धिमान, सहृदय असा कर्मचारीगण आहे. सहजयोग विज्ञानाचा त्यांना भरपूर अनुभव आहे. विद्यार्थ्यांनी ज्यांना आदर्श मानून त्यांचे अनुकरण व अनुसरण करावे असे अध्यापक आहेत. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाचे प्रेम रुजवणे, पर्यावरणाची काळजी घेणे, सभ्यता व मृदुता, उदात्तता, प्रामाणिकपणा आणि शहाणपणा असतांनादेखील साहसाची आंतरिक ओढ ह्या सर्व गोष्टींसाठी हृदयापासून संपूर्ण प्रयत्न करणे म्हणजे सहज शिक्षण होय. बालक अशा प्रत्येक गोष्टींमध्ये वावरत असते, की ज्यामुळे मानवी चेतना आणि चैतन्य लहरी समृद्ध होतात.

हे हस्तपुस्तक सहजयोग शाळांच्या मार्गदर्शनासाठी परमपूज्य श्रीमाताजी निर्मलादेवी ह्यांनी दिलेल्या भाषणांमधून संकलित केलेले आहे. धरमशाला, रोम आणि ऑस्ट्रेलियात अशा नमुन्याच्या आदर्श शाळांची स्थापना केव्हाच झालेली आहे. वरील शिक्षण पद्धतीला अनुलक्षून ह्या शाळा यशस्वी रीतीने क्रियाशील झालेल्या आहेत.

- योगी महाजन

**निर्मल विद्या प्रदान करणाऱ्या परम पूजनीय**
**श्रीमाताजी निर्मलादेवी ह्यांना प्रणाम!**

## अविद्या निवारक

आमच्या कानांनी तेच ऐकू देत की जे सत्य आहे,
आमच्या नेत्रांनी तेच पाहू देत की जे शुद्ध आहे,
आम्ही सर्व प्राणीमात्रांनी त्याचीच प्रशंसा करावी की जे दिव्य आहे.
आणि जे कोणी श्रोते आहेत -
त्यांनी माझा आवाज ऐकू नये,
तर ईश्वराची सुज्ञता श्रवण करावी.

मंगल गीताने आपण पूजन करू या.
समुचित सामर्थ्य आणि कल्याणकारक ज्ञानाने
आमचे ध्यान प्रबोधित आणि समृद्धिकारक होवो.
आमच्यामध्ये परस्परांविषयी अनुकंपा आणि शांती असू द्यावी.

श्री गणेशाला वंदन असो,
साक्षात श्रीनिर्मलादेव्यै नमो नमः।
सर्व प्रारंभांचा जो आरंभ आहे, तो आपणच आहात
जी सर्व कार्ये केली गेलेली आहेत, केली जात आहेत
आणि केली जाणार आहेत,
त्या सर्वांचे कर्तृत्व, आपणच आहात.

ज्या सर्व वस्तूंना आधार दिला गेला आहे,
त्याचे आलंबन आपणच आहात.
ज्या सर्व वस्तू संरक्षित आहेत, त्यांना आपणच संरक्षण देता.
जे संपूर्ण आहे, सर्वव्यापी चैतन्य आहे

आणि परमेश्वराची दिव्य ऊर्जा आहे,

त्या आपणच आहात.

हे मस्तका, स्पष्टपणे विचार कर, केवळ सत्यच बोल.

आम्हा सर्वांमध्ये कुंडलिनीद्वारा जागृत केली गेलेली जी आपली उपस्थिति आहे तिने बोलावे.

आम्हा सर्वांमध्ये कुंडलिनीद्वारा जागृत केली गेलेली जी आपली उपस्थिति आहे तिने श्रवण करावे.

आम्हा सर्वांमध्ये कुंडलिनीद्वारा जागृत केली गेलेली जी आपली उपस्थिति आहे तिने आशीर्वाद द्यावेत.

आम्हा सर्वांमध्ये कुंडलिनीद्वारा जागृत केली गेलेली जी आपली उपस्थिति आहे तिने रक्षण करावे.

आपले शिष्य असणाऱ्या आम्हा सर्वांमध्ये कुंडलिनीद्वारा जागृत केली गेलेली जी आपली उपस्थिति आहे ती शिष्य होवो.

सर्व पवित्र वाङ्मय आणि पावन वचनांचे सारसत्त्व आपणच आहात.

आणि त्या पावन वचनांचे आकलन करणारी ऊर्जादेखील आपणच आहात.

संपूर्ण सत्य, संपूर्ण आनंद आणि संपूर्ण चेतना

यांचा दिव्य संयोग - सच्चिदानन्द आपणच आहात.

आणि त्या सर्वांच्या पलीकडे आपण आहात.

आपण ज्ञान आहात आणि तो उपयोग आहात,

जो ज्ञानासाठी केला जातो.

## सहज शिक्षणाच्या प्रथम प्रवर्तक असणाऱ्या परम पूजनीय श्रीमाताजी निर्मला देवी ह्यांच्या दिव्य दृष्टीतील स्वप्न

शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन म्हणजे चैतन्य जागृती, आत्मजागृती होय. सहज शिक्षणाचा उद्देश वैश्विक प्रेम आणि स्वत:ला अनुशासित करून त्याद्वारे सर्वत्र सहभाग हा आहे. सहज विद्यालये विद्यार्थ्यांमध्ये आपआपसात एक असामान्य स्नेहबंध संवर्धित करतात. त्यामुळे शुद्धता, निरागसता किंवा अबोधिता आणि स्त्री-पुरुष संबंधातील पावित्र्य ह्याची जाणीव किंवा भान स्थापित केले जाते. प्रतिष्ठा, भद्रता आणि चांगल्या आचार-विचारांच्या पद्धती ह्यांच्यावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थी आपल्या नैतिकतेच्या जाणीवेचा आणि ईश्वराचे मंदिर असणाऱ्या शरीराच्या पावित्र्याचा आदर करतात.

प्रमुख उद्देशांपैकी एक उद्देश म्हणजे सर्व धर्मांचा तुलनात्मक दृष्टीने अभ्यास करण्याचे कार्य हातात घेणे हा आहे. सर्व धर्मांचे सारतत्त्व तेच म्हणजे एकच आहे हे दाखवून देण्यासाठी हा अभ्यास आवश्यक असतो. ह्यामुळे विद्यार्थ्यांचे अवधान आध्यात्मिक जीवनावर स्थिरावते. सहभाग, सहिष्णुता, खरे शांततामय सहअस्तित्व आणि त्यागाच्या आनंदातून व औदार्यातून मिळणाऱ्या आनंदाने परस्परांच्या समस्या सोडविणे हेच ते आध्यात्मिक जीवन होय. सहज शाळांमधील वातावरण शांतीपूर्ण आणि आणि प्रसन्न असते. कारण अशा प्रकारचे वातावरण अवधानात कमी अडथळे येऊन अधिक ग्रहण होऊ देते.

भावी सहृदय व दयाशील नेत्यांचे, राजनैतिक व्यक्तींचे त्याचप्रमाणे सद्‌गुणसंपन्न शूर वीरांचे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे बीज बालपणातच रुजवले जाते. त्यामुळे संजीवित अंकुराची, त्याचे बीज पेरण्याची आणि त्याची निगा

राखण्याची पराकोटीची काळजी एक सजीव पद्धतीने घेतली जाईल. सर्व कार्यनीति स्वाभाविकपणे अशाच साच्यातून घडवून काढलेल्या आहेत की त्यामुळे विद्यार्थी स्वतःच्या सुप्त सामर्थ्याचा पूर्ण विकास करेल. कारण सहजयोगाला अनुसरून होणारे त्यांच्या आध्यात्मिक उत्क्रांतीचे प्रात्यक्षिक स्वरूप ते विद्यार्थी अनुभवतील.

अध्ययन प्रक्रियेला भरभक्कम पाया मिळावा व तो स्थिर व्हावा ह्याचीच प्रस्तावना, प्रारंभिक ओळख सहज शिक्षण प्रणालीत आहे, ती अशी-

१. महात्मा गांधींनी जशा शिक्षण प्रणालीचे स्वप्न आपल्या दूरदृष्टीने पाहिले होते, त्याच प्रकाराने आनंदी, मैत्रीपूर्ण, कौटुंबिक आणि सचेतन वातावरणात सर्व विषयांचे प्रारंभिक मूलभूत ज्ञान ह्या प्रक्रियेने दिले जाते.

२. विद्यार्थ्यांमधील स्वाभाविक जिज्ञासा, सृजनशीलता आणि कल्पनाशक्ती ह्या गुणांना शांतीपूर्ण वातावरणात प्रोत्साहित केले जाते.

३. आध्यात्मिक आणि नैतिक तत्त्वे समजावून घ्यावी म्हणून विद्यार्थ्यांकरिता ही प्रक्रिया एक प्रत्यक्ष व व्यवहार्य मार्ग आहे.

४. प्रत्येक विद्यार्थ्याला आपले व्यक्तिमत्व आणि स्वतंत्र व्यक्तित्त्व ह्यांचा विकास करू दिला जातो. आणि तरीसुद्धा अभिव्यक्ती, काम करणे, सहभागी होणे आणि स्पर्धा निर्माण न होऊ देता सुसंवाद राखून खेळणे या गोष्टी धारण करून राखून ठेवण्याचे सामर्थ्य येते. आणि अशा रीतीने वास्तविकता असलेल्या सामूहिकतेचा आनंद घेता येतो.

५. दयाळुपणा, धैर्य, औचित्य, संवेदनशीलता, प्रतिष्ठा, करुणा, दुसऱ्यांचा विचार करणे आणि सहज उत्स्फूर्तता ह्या माणसाच्या स्वाभाविक जन्मजात प्रवृत्ती आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये प्रेम आणि आदराद्वारे अशा प्रकारच्या सहज मानवीय वृत्तीला सहज शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे उमलविले जाते. ह्या शिक्षण पद्धतीमुळे बालक स्वतःमध्ये पूर्णपणे स्थिर होतो.

खोटेपणा, फसवेगिरी आणि केवळ वर वर बाहेरून प्रकल्पित केली गेलेली मूल्ये त्याला सहजपणे लक्षात येतात. मुलांमध्ये सुजाणपणाचा भाव जागृत करून त्यांच्यातील व्यावहारिक बुद्धि आणि समजुतदारपणा वाढवला जातो. उदाहरणार्थ दैनंदिन जीवनाचे प्रत्यक्ष ज्ञान दिले जाईल-जसे की आजीबाईंचा बटवा. त्यामुळे विद्यार्थी स्वत:ला व इतर बांधवांना मदत करतील.

६. आई-वडिल, ज्येष्ठ लोक, शिक्षक, बांधव, सार्वजनिक संपत्ती, देश आणि सर्व जग या सर्वांविषयी आदरभाव आणि कर्तव्य ह्या बालकाच्या वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदाऱ्या आहेत. बालकामध्ये ह्या सर्व गोष्टींची जाणीव, जागरूकता व त्याची काळजी घेण्याची वृत्ती निर्माण केली जाते.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | श्रीगणेशतत्त्वाची प्रतिष्ठापना | १२ |
| २ | जन्मजात साक्षात्कारी आत्म्यांचा विकास | २४ |
| ३ | औदार्याला प्रोत्साहन द्या | २७ |
| ४ | आत्मसन्मान | ३० |
| ५ | मुलांना प्रतिष्ठा द्या. | ३३ |
| ६ | प्राकृतिक गुणविशेष | ३४ |
| ७ | अनुशासन | ३८ |
| ८ | अन्न | ४२ |
| ९ | मुलांनी स्वाभाविकपणेच सामूहिक असावयास पाहिजे | ४५ |
| १० | मुलांच्या चुका सुधारून त्यांना ठीक कसे करावे? | ५१ |
| ११ | पैसा | ५३ |
| १२ | भाषा प्रसन्न असावयाला पाहिजे | ५४ |
| १३ | दिवा दुसऱ्यांसाठी जळतो, स्वत:साठी नव्हे | ५६ |
| १४ | सहजसंपर्क वाढवा | ६० |
| १५ | आपल्या मुलांप्रमाणे सर्व मुलांवर प्रेम करा | ६२ |
| १६ | खेळ | ६३ |
| १७ | विश्वविद्यालयीन शिक्षण | ६४ |
| १८ | विद्यार्थ्यांच्या वर्गात | ६५ |
| १९ | माझ्या फुलांसारख्या मुलांसाठी | ७६ |

# प्रकरण १

## श्रीगणेशतत्त्वाची प्रतिष्ठापना

श्रीगणेश अत्यंत शक्तिसंपन्न देवता आहे. अशा श्रीगणेशाचे तत्त्व जर आम्ही आमच्या अंतरंगात जागृत केले तर बालसदृश निर्व्याज स्वभाव आमच्यामध्ये जागृत केला जाऊ शकतो. समजा, एखादा मुलगा हरवलेला आहे किंवा कुठेतरी झाडावर लटकून अडकलेला आहे, तर त्या मुलाला बाहेर काढण्यासाठी सगळेजण धावून जातील. सर्वांचे चित्त तिथेच लागलेले राहील. अशा प्रकारे त्या मुलाला स्वत:मुळेच सर्वबाजूंनी संरक्षण मिळते. कारण की ते मूल वाढत्या वयाचे असल्यामुळे प्रत्येकालाच त्या मुलाला मदत करावयाची असते. प्रत्येक पूजेच्या पूर्वी आपण श्रीगणेशाचे स्तवन करीत आलो आहोत आणि आपल्याला श्रीगणेशांविषयी नितांत आदर आहे. कारण आपल्याला असे आढळून आलेले आहे की आमच्या अबोधितेचे प्रतीक असणारे श्रीगणेश जोपर्यंत आमच्यामध्ये जागृत होत नाहीत तोपर्यंत परमेश्वराच्या राज्यात आम्ही प्रवेश करू शकत नाही. एवढेच नव्हे तर परमेश्वरी राज्यात राहण्यासाठी आणि श्रीगणेशाच्या आशीर्वादाचा आनंद उपभोगण्यासाठी आम्हाला आमच्यातील अबोधिता पूर्णपणे बहरास आणली पाहिजे. म्हणून आपण श्रीगणेशाची स्तुती करतो आणि श्रीगणेश हे अगदी सहजपणे प्रसन्न होतात. सहजयोगात येण्यापूर्वी आपल्याकडून जे काही चुकीचे कृत्य घडले असण्याची संभावना असेल तर श्रीगणेश त्याबद्दल आपल्याला पूर्णपणे क्षमा करतात कारण श्रीगणेश एक चिरन्तन बालक आहेत.

तुम्ही पाहिलेलेच आहे, की मुलांना तुम्ही धपाटा मारता किंवा कधी कधी त्यांच्यावर रागवता, पण मुले हे सर्व विसरून जातात. त्यांना तुमचे

त्यांच्यावर असलेले प्रेमच फक्त आठवते. तुमच्या हातून त्यांना जो त्रास झाला, मार मिळाला, ते त्यांना आठवतच नाही. जोपर्यंत मुले मोठी होत नाहीत तोपर्यंत त्यांच्याबाबतीत ज्या वाईट गोष्टी केल्या गेल्या आहेत त्याचे त्यांना स्मरणच राहत नाही. अगदी सुरुवातीपासून आईच्या पोटातून बाळाचा जन्म होईपर्यंत त्याला काय काय अनुभवावे, भोगावे लागले, हे मुलाला आठवतच नाही. मग हळूहळू त्याची स्मरणशक्ति काम करायला लागते आणि तो त्या गोष्टी स्वत:मध्ये गोळा करून ठेवायला लागतो, पण सुरुवातीला मात्र त्याच्या बाबतीत घडलेल्या कोणत्या छान छान गोष्टी आहेत, त्याच तेवढ्या त्याला आठवतात. म्हणून जेव्हा आपण आपल्या बालपणाबद्दल विचार करायला लागतो तेव्हा लहानपणी आपण ज्या गोष्टींचा आनंद लुटला त्याविषयीच विचार करायला आपल्याला आवडते, पण आपण जसजसे मोठे होत जातो, तसतसे सर्व दु:ख, व्यथा, वेदनांमधून आपल्याला जावे लागले, सर्व दिव्ये ज्यांच्यातून आपल्याला पार पडावे लागले, ह्या सगळ्यांचे स्मरण आपल्याला होण्यास प्रारंभ होतो आणि आम्ही त्यांना वाढवून मोठमोठे रूप देण्याच्या प्रयत्नात असतो. लहानपणी मुलांना तेच लोक आठवतात ज्यांनी त्यांच्यावर प्रेम केलेले आहे; ते लोक नव्हेत की, ज्यांनी त्यांना दुखावलेले आहे. असे दिसते, की कदाचित त्यांना ते आठवावयाचेच नसते, पण मुले मोठी झाली की, ज्या लोकांनी त्यांना त्रास दिला किंवा दुखावले त्याच लोकांना स्मरणात ठेवण्याचा ते प्रयत्न करतात. अशा प्रकारे ही मोठी झालेली मुले स्वत:ला अत्यंत दु:खी कष्टी बनवतात.

परंतु श्रीगणेशतत्त्व हे पराकोटीचे सूक्ष्म आहे. ते सूक्ष्मातले सूक्ष्मतम आहे आणि ते प्रत्येक गोष्टीत विद्यमान आहे. प्रत्येक द्रव्यात, पदार्थात ते चैतन्यलहरींच्या रूपात अस्तित्वात आहे. असे कोणतेही द्रव्य (मॅटर) नाही की जे चैतन्य लहरींशिवाय आहे. द्रव्याला चैतन्यलहरी असतात ज्या

अणूंमध्ये आणि परमाणूंमध्येसुद्धा दिसून येतात. अस्तित्वात असलेल्या सर्व द्रव्याच्या बाबतीत असेच आहे.

श्रीगणेश हे सर्वप्रथम आहेत की ज्यांना द्रव्यातही स्थापित केले गेले आहे. त्याचा परिणाम म्हणून आपण पाहतो, की श्रीगणेश सूर्यात विराजमान आहेत. ते चंद्रात अस्तित्वात आहेत. ते संपूर्ण विश्वात विद्यमान आहेत, सर्व सृष्टीत आहेत आणि मनुष्यप्राण्यातसुद्धा त्यांचे अस्तित्व असणे सुरू आहेच. केवळ मनुष्यप्राण्यांमध्येच अशी क्षमता आहे, की या ना त्या प्रकाराने ते आपल्या अबोधितेला झाकून ठेवतात. नाहीतर जनावरे निष्कपट, निरागस असतात. जर आपली अबोधिता झाकून ठेवायची असली तर केवळ मनुष्यमात्रांनाच स्वातंत्र्य आहे. त्यांना पाहिजे असेल तर ते आपल्या अबोधितेला झाकून टाकू शकतात आणि श्रीगणेशाची दारे स्वत:साठी कायमची बंद करू शकतात आणि म्हणू शकतात की, श्रीगणेश अस्तित्वातच नाहीत. ते अबोधितेला पूर्णपणे झाकाळून टाकू शकतात. ह्यामुळेच आपल्याला आढळून येते की, मनुष्यप्राणीच अनेकानेक भयंकर कृत्ये करीत आहेत. कारण ते श्रीगणेशाचे अस्तित्वच टाळतात, श्रीगणेशाला आणि अबोधितेला जुमानत नाहीत. परंतु श्रीगणेश कृती करतातच. ते अशा पद्धतीने कृती करतात की आमच्या चुकीच्या कृत्यांचे नैसर्गिक परिणाम त्या कृतीतून दिसतात. जसे की, तुम्ही अशा काही गोष्टी करता की त्या श्रीगणेशांना मुळीच आवडत नाहीत. ते एका विशिष्ट बिंदुपर्यंत जातात, काही मर्यादेपर्यंत तुम्हाला क्षमा करतात. नंतर मात्र ते रोगांच्या, शारीरिक रोगांच्या रूपाने बाहेर पडतात आणि स्त्रियांमध्ये ती एक मानसिक व्याधी होते. हे दुराचरण आणि त्यामुळे उद्‌भवलेली श्रीगणेशांची अवकृपा निसर्गातही समस्या निर्माण करू शकते. नैसर्गिक विपत्ती म्हणजे केवळ श्रीगणेशांचा शाप होत. जेव्हा लोक चुकीची कृत्ये करायला लागतात आणि सामूहिकतेने दुराचरण करावयाला सुरुवात करतात, तेव्हा त्यांना धडा शिकविण्यासाठी

नैसर्गिक आपत्ती येतात. असे असले तरी श्रीगणेश आपल्या सार-सत्त्व रूपाने प्रत्येक वस्तूमध्ये विद्यमान आहेत.

संपूर्ण जगाचा विनाश घडवून आणण्याच्या आपल्या इच्छेला दृढतेने कार्यान्वित करण्याची क्षमता श्रीगणेशांमध्ये आहे. आमची श्रीगणेशाबद्दलची कल्पना म्हणजे ते एक सूक्ष्म किंवा चिमुकली गोष्ट आहेत. आम्ही असा विचार करतो, की श्रीगणेश जर एका लहानशा उंदरावर बसून जाऊ शकतात तर मग ते लहानच असावयास हवेत. पण ते जितके सूक्ष्म, लहान आहेत तितकेच ते महान आहेत. आपल्या सुज्ञतेमुळे ते सर्व देवतांपेक्षा वरचढ आहेत. ते सुज्ञता-शहाणपणा देणारे आहेत. ते आपल्याला विद्या देतात. ते आपल्याला शिकायला लावतात. ते आपले गुरु आहेत, अशाप्रकारे तर ते महागुरुच आहेत. कारण आपण कसे वागावयास पाहिजे हे श्रीगणेशच आपल्याला शिकवतात. जर तुम्ही त्यांच्याहून वरचढ होण्याचा प्रयत्न केलात आणि चुकीचे वर्तन करण्याचा प्रयास केलात तर आई (श्रीमाताजी) सुद्धा तुम्हाला पाठिंबा आणि आधार देणार नाही. कारण आईला हे माहीत आहे, की श्रीगणेशापेक्षा जे लोक वरचढ होण्याचा प्रयत्न करतात, ते लोक आईचा कधीही आदर करणार नाहीत. म्हणून श्रीगणेश मातेविषयीच्या आदराचा एक आदर्श आहेत. त्यांना दुसरे कोणतेही देव माहीत नाहीत. ते सदाशिवालासुद्धा जाणत नाहीत. त्यांना दुसरे कोणीही माहीत नाही. ते केवळ मातेचा आदर करतात. त्यामुळे तेच एकमात्र असे आहेत, की जे भक्तीचे मूर्तीमान सामर्थ्य आणि मातेसमोर संपूर्ण शरणागतीचे साक्षात् रूप आहेत. ह्यामुळेच ते सर्व देवीदेवतांमध्ये सर्वात सामर्थ्यसंपन्न आहेत आणि कोणीही सामर्थ्याच्या बाबतीत त्यांना मागे टाकून पुढे जाऊ शकत नाही.

आपल्याला हे समजून घ्यायला पाहिजे, की मुले जसजशी वाढत जातात, तसतशी त्यांच्यातील गणेशतत्त्वाची वाढ होऊ लागते. परंतु ते

मनुष्यप्राणी असल्याने ते येनकेन प्रकारेण श्रीगणेशापेक्षा सामर्थ्याच्या बाबतीत वरचढ होण्याचा प्रयत्न करू शकतात. तेव्हा सहजयोगी पालकांचे हे कर्तव्य आहे, की त्यांनी मुलांची काळजी घेतली पाहिजे. अशाप्रकारे अनासक्त मार्गाने काळजी घ्यावी, की मुलांमध्ये गणेश तत्त्व प्रस्थापित आणि स्थिर झाले पाहिजे. मुलांमध्ये श्रीगणेशाची पहिली खूण म्हणजे त्याचा शहाणपणा, सुजाणपणा होय. मुलगा जर सुजाण नसेल, जर तो त्रासदायक असेल किंवा कसे वागावे हे त्या मुलाला कळत नसेल तर त्या मुलाकडून त्याच्यातील गणेशतत्त्वावर आक्रमण होत आहे हेच निदर्शनास येते. आजच्या काळात पाहू गेले तर असे आहे, की मुलांच्या गणेश तत्त्वावर अत्यंत आक्रमण होत आहे.

लहान मुलाला कोणतीही भीती नसते. श्रीगणेशाला तर बिलकुल कसलेही भय नाही. जोपर्यंत तुमची आई तुमच्याबरोबर आहे, तोवर तुम्ही का म्हणून भीती बाळगायला पाहिजे? ह्याची भीती, त्याची भीती! 'मला भीती वाटते. मी हे करू शकत नाही, ते करू शकत नाही.' काय हे? लहान मुले असे कधीही करत नाहीत. तुम्ही त्यांना सांगितले तर ते प्रत्येक गोष्ट करण्याचा प्रयत्न करतील. तुम्हाला कसलीही भीती नको. मला तर भीती म्हणजे काय हेच माहीत नाही. परंतु चुकीच्या गोष्टी करू नका. जर तुम्ही चुकीच्या गोष्टी केल्या तर त्याचा प्रतिरोध होईल, त्या दूर ढकलल्या जातील. ते तुमच्यावरच उलटेल. अगदी साधे-सरळ, स्पष्ट राहा आणि कोणतीही गोष्ट तुम्हाला इजा करू शकणार नाही. तुमच्यासाठी प्रत्येक गोष्टीची जय्यत तयारी केली गेलेली आहे. प्रत्येकजण तुमची काळजी घेत आहे. अशा कितीतरी देवता आहेत, की ज्या तुमच्यासाठी गोष्टी घडवून, सुरळीत करून ठेवत आहेत. तुम्हाला कमालीची काळजी घेतली पाहिजे, की ही भीतीची भानगड तुम्ही उद्‌भवू देऊ नये आणि वाढवू नये. कारण भीती तुम्हाला डाव्या बाजूकडे घेऊन जाते आणि एकदा का तुम्ही डाव्या बाजूला गेलात,

की डाव्या बाजूच्या समस्या काय आहेत हे तुम्हाला माहीतच आहे. सर्वप्रथम म्हणजे तुम्ही श्रीगणेशाच्या विरोधात जाता. डाव्या बाजूच्या मुळाशी खाली श्रीगणेश उभे आहेत. भावनांच्या बाबतीत बोलायचे झाले तर तुम्ही आनंदाने उचंबळत असायला पाहिजे. आनंद हीच तुमची खरी भावना आहे. प्रत्यक्ष कृतीमध्ये तुम्ही निर्विचार असावयास हवे आणि उत्थानाच्या प्रसंगात तुम्ही शरणागत असायला पाहिजे. एवढेच काय ते! हे फार साधे, सोपे आहे. लहान मुलांसाठी तीन मंत्र फारच साधे, सोपे आहेत.

अबोधितेवर आक्रमण होत आहे आणि मुलांची साथ कुठपर्यंत द्यावी आणि त्यांच्याबरोबर किती दूरपर्यंत जायचे नाही हे जाणण्यासाठी तरल सूक्ष्म सीमारेखा कशी आखावी हे माता-पित्यांसाठी अत्यंत कठिण होऊन बसले आहे. पालकांना हे समजायला पाहिजे की जर सुज्ञता प्रदान करणारे श्रीगणेश आहेत तर माझ्यातही थोडीफार सुज्ञता असायला पाहिजे. जर माझ्याकडे शहाणपणा, सूज्ञता आहे तर माझ्यात संतुलन पण आहे आणि लहान मुलांवर चिडत, रागवत नाही. परंतु मी त्यांच्या चुका सुधारण्याचा प्रयत्न अशा तऱ्हेने करतो, की त्यांची नेमकी चूक त्यांना कळते आणि ते सुधरतात.

उलटपक्षी तुम्ही जर तुमच्या मुलांशी अत्यंत कठोर राहण्याचा प्रयत्न केलात तर होऊ शकते, की ते प्रतिक्रिया देतील आणि भरकटून वाईट वाटेवर जातील किंवा तुम्ही त्यांच्याबाबतीत फारच जास्त कडक राहण्याचा प्रयत्न केलात तरीदेखील मुले त्याच पद्धतीने वागतील. स्वत: श्रीगणेश जसे बोलतील किंवा श्रीगणेशाशी तुम्ही जसे बोलाल तसेच तुमच्या मुलांशी तुम्ही बोलावे आणि तुमच्या आईचा (श्रीमाताजींचा) आदर करण्यास शिकवावे. तुमची आई म्हणजे परम पूजनीय श्रीमाताजी आणि तुमची स्वत:ची आई! हे सगळं अतिशय महत्त्वाचं आहे. जर वडिलांनी स्वत:च्या मुलांना आपल्या आईचा आदर करायला लावलं नाही, तर मूल कधीही ठीक

असणार नाही. कारण पित्याकडेच अधिकार असतो ह्यात काही संशय नाही, परंतु आईचा आदर केला गेलाच पाहिजे, पण त्यासाठी हे देखील अत्यंत महत्त्वाचं आहे, की आईनेही वडिलांचा आदर करणं आवश्यक आहे. त्यामुळे मुलांच्या उपस्थितीत जर तुम्ही एकमेकांशी भांडायला, दुर्वर्तन करायला किंवा जे उचित नाही अशा पद्धतीने वागायला सुरुवात केलीत तर त्याचा मुलाच्या गणेशतत्त्वावर अत्यंत वाईट परिणाम होईल. सहजयोगात मुलांचे असे हे पालन पोषण आणि संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहेत. कारण देवाच्या कृपेने तुम्हा सर्वांना आत्मसाक्षात्कारी मुलं प्राप्त झालेली आहेत. त्यामुळे वागतांना आपल्या मुलांशी किती मर्यादेपर्यंत अनुकूल राहायचं, त्यांच्याबरोबर कितपत दूर जायचं हे तुम्हाला माहीत असायलाच पाहिजे. कारण त्यांना अधिक सुजाण, नैतिक आणि सदाचरणी तुम्हीच बनवायचे आहे. त्यासाठी पहिली गोष्टी अशी, की त्यांच्या सुज्ञतेला जतन करून ठेवण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे. जर ते शहाणपणाचे काहीतरी बोलले तर तुम्ही त्याला दाद दिली पाहिजे. त्यांचे कौतुक केले पाहिजे, पण त्यांनीसुद्धा अस्थानी किंवा अशोभन बोलायला नको. तेव्हा दुर्वर्तनसुद्धा सहन करावयाचे नाही ते ह्या अर्थाने की अंतरंगात जी सुज्ञता आहे ती बाहेर प्रकाशाच्या रूपात प्रकट केली जावी.

श्रीगणेश तुमच्यामध्ये अधिक उच्च आत्मतत्त्वाची प्रतिष्ठापना करतात. निम्न स्तरावरील जीवात्मा खालच्या स्तरावरील गोष्टींचाच आनंद आयुष्यात उपभोगतो. जसे तुम्ही मोनालिसाचं चित्र पाहता. मला माहीत नाही, पण ती नटी असू शकत नाही. ती कोणत्याही सौन्दर्य स्पर्धेत असणे शक्य नाही. तिचा चेहरा अत्यंत प्रसन्न, शांत, आईपणा दाखवणारा आहे. तिचे डोळे तर अत्यंत निर्मळ आहेत आणि ह्याच कारणामुळे तर तिचे सदासर्वदा कौतुक केले जात असेल तर? त्याचे कारण असे आहे, की तिच्यात गणेश तत्त्व विद्यमान आहे. ती एक आई आहे. तिच्या बाबतीत अशी एक कहाणी आहे,

की ह्या बाईचे मूल मरण पावले होते. त्यामुळे ती कधी साधे स्मितही करीत नसे, हासणे तर दूरच; आणि कधीही रडत नसे आणि एकदा तिच्याकडे एक लहान मूल आणले गेले. तिने त्या मुलाकडे पाहिले आणि त्या मुलाबद्दलच्या प्रेमामुळे तिच्या चेहऱ्यावर जे स्मितहास्य उमटले, तेच त्या महान कलावंताने चित्रात रंगवले आहे. त्यामुळेच त्या चित्राचे लोक एवढे कौतुक करत असतात.

पाश्चिमात्य देशांच्या बाबतीत तुम्ही असे पाहिलेले आहे, जरी आई-मूल ह्या नात्यात ते लोक खास रुचि दाखवत नसले तरी तुम्ही कुठेही जा, आई-मूल हा विषय तिथे सर्वोत्तम आहे. ते तुम्हाला एक फोटो दाखवतील. हे आई-मूल असणारे चित्र आहे. ही ख्रिस्ताची माता आणि बालख्रिस्त आहेत. जेव्हा ख्रिस्ताचा अवतार झाला, तेव्हा आई असलीच पाहिजे ना! त्यांच्या दृष्टीने कार्यान्वित झालेले आई-मूल हे तत्त्व त्यांच्याकडे असायलाच पाहिजे. नाहीतर ते चित्र काही महान वगैरे आहे असे मानले जात नाही. किंवा तुम्हाला प्रत्यक्षात ख्रिस्तच दाखवावयास हवा. कारण ख्रिस्त स्वत:च गणेश तत्त्व आहे. ज्या ठिकाणी ही तत्त्वे नाहीत असे त्या काळातले एकही चित्र मी पाहिलेले नाही. पिकासोनेसुद्धा ह्या तत्त्वाचा उपयोग केलेला आहे. किंबहुना जे लोक अत्यंत आधुनिक आहेत त्यांनासुद्धा लोकप्रिय करण्यासाठी ह्या तत्त्वाचा उपयोग करावा लागला. परंतु काही लोकांनी गणेश तत्त्व लोकप्रिय करण्यासाठी त्याचा उपयोग केला नाही, तर केवळ गणेश विरोधी तत्त्वांसाठी केला.

ह्या सर्व गोष्टी विरळ हवेत उडून नाहीशा झाल्या आहेत आणि मला दिसते आहे, की आता हळूहळू ते सर्व खाली घसरत चालेले आहे. ही खरी गोष्ट आहे की लोकांनी आपली नैतिकता गमावलेली आहे. परंतु अजूनही त्यांना रेम्बाटला स्वीकारायला चालेल. त्यांना लिओनार्दो दा विंचीला स्वीकारायला आवडेल. त्यांना असे कलावंत स्वीकारायला आवडतील

ज्यांनी आई-मूल ह्या विषयावर कलाकृती केलेली आहे. हे खरोखरच फारच आश्चर्यकारक आहे. अगदी मी ह्यावेळी ऑस्ट्रियाला जेव्हा गेले तेव्हा त्यांना म्हटले की, 'तुमच्याजवळ कोणते पुतळे, मूर्ती आहेत?' ते म्हणाले, 'आमच्याकडे एक सुंदर मेडोना आणि तिचे बाळ आहे.' आई-मुलाचे हे वात्सल्याचे तत्त्व मनुष्यजातीला सर्वात आनंद देणारे तत्त्व आहे. मुलांना पाहणे, त्यांच्याबरोबर खेळणे, त्यांच्या सहवासाची मौज लुटणे ह्या सर्व गोष्टी! का? कारण त्याच्यात लहान मुलाचा गोडवा आहे. जेव्हा तुम्ही लहान बाळ पाहता तेव्हा तुमच्या आत खरोखरचे आनंदाच्या गुदगुल्या होतात. तुमचा चेहरा लगेच वेगळा होतो. मी एका चित्रपटात पाहिले. एक मगर तिची अंडी फोडत होती. त्यावेळी तुम्ही त्या मगरीचे डोळे पाहायला हवे होते. तिच्या डोळ्यांमधून प्रेम ओसंडून वाहत होते. माझा विश्‍वासच बसत नाही की ही त्याच मगरीची नजर आहे. ती आपल्या तोंडाने अगदी हळुवारपणे अलगद अंडी फोडते आहे आणि छोटी-छोटी पिल्ले बाहेर येत आहेत. मग ती त्यांना किनाऱ्यावर घेऊन येते आणि एवढ्या साऱ्या वेळेत त्यांना आपल्या तोंडातच स्वच्छ धुवत असते. इतक्या काळजीपूर्वक! तुम्ही बघाच, ती आपल्या तोंडाचा उपयोग स्नानगृहासारखा करीत असते. जनावरे आणि इतर प्राणीसुद्धा आपल्या पिल्लांशी कसे वागतात हे तुम्ही पाहायला पाहिजे. पण ज्याला म्हणतात ना, तसे तथाकथित आधुनिक तुम्ही जेव्हा बनता, तेव्हा तुमच्या सगळ्या क्रिया, हालचाली अगदी गमतीदार असतात. असेही लोक आहेत की जे आपल्या मुलांचे बालपण नासवून टाकतात. हे तर राक्षसांपेक्षाही वाईट आहे. असे तर अगदी राक्षसांनीही केले नाही, पिशाच्चांनीही केले नाही. अगदी गणांनादेखील आश्‍चर्य वाटते की हे नवीन विचित्र प्राणी कुठून आले आहेत म्हणून!

लहान मुलांविषयीचे प्रेम निखालसपणे महत्त्वाचे असायलाच पाहिजे. परंतु तुम्ही सहजयोगी आाहात, त्यामुळे तुम्हाला फक्त आसक्ती नसावी.

दुसरी गोष्ट अशी की, आपण कुठे संपूर्ण सीमारेखा आखायला हवी, हे तुम्हाला कळायला पाहिजे. ही सीमारेखा म्हणजे कल्याण करण्याची भावना होय. माझ्या मुलासाठी हे हितकारक होईल काय? मी माझ्या मुलाला बिघडवत आहे का? मी माझ्या मुलाला फारच जास्त, नको तेवढे प्रोत्साहित करीत आहे का? मी माझ्या मुलाच्या हातातील खेळणं तर होत नाही ना? किंवा मी माझ्या मुलाला व्यवस्थित सांभाळत आहे ना? कारण मुलांवर लहानपणी त्यांच्या आई-वडिलांचं नियंत्रण असतं. त्यांनी मुलांना सांगितलंच पाहिजे, मुलांनी आज्ञाधारक असायलाच पाहिजे आणि त्यांनी आपल्या आई-वडिलांचं ऐकायलाच पाहिजे.

काही लोक वयाने आपल्यापेक्षा लहान असतात. काही आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात. काही लोकांची बुद्धिमत्ता जेमतेमच असते किंवा काही लोकांजवळ सहजयोगाचे पुरेसे ज्ञान नसते किंवा ते सहजयोगात फारसे मुरलेले नसतात, अशा लोकांची काळजी आपल्याला वडील जशी मुलांची काळजी घेतात, तशी घेणे आवश्यक आहे किंवा असे म्हणा की आई जशी काळजी घेते तशी घ्यायला पाहिजे. ते काही फारसे बरोबरीचे नाहीत. तर ठीक आहे. आमच्याजवळ गणेशतत्त्व आहे ना! मग त्यांचे गणेशतत्त्व जागृत करून उत्तेजित करा. प्रभुत्व मिळविण्यासाठी किंवा अधिक उच्च स्तरावरची अवस्था प्राप्त करण्यासाठी ते आपल्यावर अवलंबून आहेत असं त्यांना वाटलं पाहिजे. कारण गुरुतत्त्व हे पूर्णपणे गणेशतत्त्वाशी बद्ध आहे. जर गुरुमध्ये गणेशतत्त्व नसेल तर तो एक भयंकर मनुष्य बनतो आणि कोणीही त्याला चिकटून बसू इच्छित नाही म्हणजे त्याचा शिष्य व्हायला तयार नसतं. ते सगळे त्याच्यापासून दूर पळतात. गुरु कदाचित शिष्यांना शिक्षा करेल किंवा त्यांच्यावर रागवेलसुद्धा! परंतु मुळात तो असा विचार करतो, 'ही माझी एक असामान्य विलक्षण ठेव आहे. मी त्याचा विकास करतो आहे, मी त्याला घडवतो आहे.' परंतु आधुनिक विचारसरणी अशी आहे, की मुलांना

स्वतंत्र व्यक्ती म्हणून राहू द्यात. त्यांना आत्मनिर्भर असू द्या. आई आणि वडिलांनी ज्या पद्धतीने स्वत:च्या मुलांचे संगोपन करायला पाहिजे, त्याप्रमाणे ते करीत नाहीत. जसे की, ‘हा बघा, हा माझा मुलगा आहे. माझ्याजवळ एक विशिष्ट प्रतिभा आहे. मी त्याला शिकवायलाच पाहिजे. तो वर यायला पाहिजे. माझ्या स्वत:च्या पुढे चालत राहणारा निरंतर स्रोत म्हणजे तोच एक आहे.’ परंतु प्रत्येकाला एक व्यक्ती मानून वागवण्याची कल्पना म्हणजे ‘तू अठराव्या वर्षी आता स्वतंत्र व्यक्ती आहेस, तेव्हा तू घराच्या बाहेर निघून जा. तुला जे आवडेल ते कर. तू स्वत:च्या पायावर उभा राहा.’ असे नाही. जीवन नेहमी पूर्णत्वाशी जोडलेलं असतं. जोपर्यंत तुम्ही पूर्णपणे जोडले जात नाही, तोपर्यंत सामूहिकतेची अबोधिता काय असते हे समजू शकत नाही.

मी कधी कधी पाहते, कोणाचे तरी मूल दुसऱ्या कोणच्या तरी मांडीवर अगदी मजेत बसते आहे. ते मूल त्या व्यक्तीकडे अशा प्रकारे येतं की जसं काही तेच त्याचे वडील आहेत. मूल जवळ येते आणि सहजपणाने तुमच्या मांडीवर विसावते. त्याला हे माहीतदेखील नसतं, की ते त्याचे वडील नाहीत. परंतु अशा प्रकारचा अंतर्बोध अजून तिथे नाही. त्यामुळे ‘माझे’ किंवा ‘हे माझे आहे, हे माझे आहे’ ही स्वामित्वाची भावना तुटून, गळून पडते, नाहीशी होते आणि त्यामुळे तुमच्या मनात असा भाव निर्माण होतो, की आम्ही आता एक साधन आहोत. आपण म्हणू शकतो, की एक उपाय, एक उपकरण किंवा एक माध्यम आहोत, की ज्याच्या द्वारे आपण प्रत्येक जागी सर्वत्र गणेशतत्त्वाला प्रकट करू शकतो. हे गणेशतत्त्व म्हणजेच चैतन्य लहरी होत. ज्याची तुम्ही तुम्ही मागणी, याचना करीत होतात त्याच ह्या चैतन्य लहरी होत! ह्या चैतन्य लहरी म्हणजे दुसरं तिसरं काहीही नसून गणेशतत्त्वच आहे, ओंकार आहे. हाच तो वात्सल्याचा भाव म्हणजे आई-बाळामधील प्रेमाची अनुभूती होय. ही अनुभूती, हा भाव म्हणजेच आई-

मुलामधील चैतन्य लहरी होत. आई आणि मूल ह्या दोघांमधील अंतर म्हणजेच चैतन्य लहरी! त्यामुळे प्रत्येकाला असं वाटायला पाहिजे की तो अजूनही एक लहान मूल आहे आणि तिथे आईदेखील आहे. आई बाळाला वाढवते आहे, मुलाला आपल्या सगळ्या शक्ती देते आहे आणि प्रेमाने त्याचे पालन-पोषण करते आहे आणि त्या मुलाच्या मर्यादादेखील समजून घेते आहे, त्या सर्व गोष्टींची काळजी घेते आहे. त्या मुलाचा गोडवा, त्याचा सगळा शहाणपणा ह्या गोष्टीचे कौतुक करायचं असतं आणि हे म्हणजेच चैतन्य लहरी!

तुम्हाला तुमच्या मुलाला उचित आणि सुबुद्ध नैतिकतेचं मार्गदर्शन करायचे आहे. पण त्यासाठी तुम्ही स्वः योग्य प्रकारे वागलं पाहिजे. तुमच्या मुलांच्या उपस्थितीत तुम्ही शृंगारिक प्रेमभाव दाखवू नये. टी.व्ही.आणि त्यावर ते लोक ज्या काही गोष्टी दाखवतात त्याबाबतीत तुम्ही काळजी घ्यायला पाहिजे. मुलं जे काही पाहतात त्याबाबतीत तुम्ही सावधान असायला पाहिजे आणि हे सगळं चूक आहे असं त्यांना बोलायला पाहिजे. आणि ह्यामुळे आपल्यासमोर एक समस्या उभी राहील. पण जर तुमचा मुलांशी योग्य सहजसंपर्क, सुसंवाद असेल तर मग तुम्हाला कोणतीही समस्या राहणार नाही. त्यांच्याजवळ एवढं मोठं शिक्षण आहे, असं असतांनादेखील मुलांच्याबाबतीत अनेक समस्या भेडसावतात. जर मुलांना अबोध, निरागस ठेवलं तर ते कधी भलत्यासलत्या गोष्टींमध्ये मजा घेणार नाहीत. कुतूहलामुळे निर्माण झालेल्या कोणत्याही समस्या मला कधीही येत नाही. त्यांचे कुतूहल, उत्सुकता कधी चाळवू नका. तुम्ही सुखी व्हाल आणि मग ते अगदी सुरुवातीपासून नैतिकतेच्या आधारावर प्रारंभ करतील. तुम्ही मुलांना हेच द्यायचे आहे - एक उचित नैतिक भान!

## प्रकरण २

# जन्मजात साक्षात्कारी आत्म्यांचा विकास

आम्ही आमच्या मुलांचे संगोपन कसे करावे, ह्याचे आमच्या दृष्टीने फार मोठे महत्त्व आहे. कारण सहज पद्धतीने ज्यांचा विवाह झाला आहे त्यामध्ये बहुधा अनेकांना अशी संतती झाली आहे की ते साक्षात्कारी आत्मे आहेत. ह्याचा अर्थ असा की, ती अत्यंत उच्च प्रतीची मुले आहेत आणि अशा मुलांचे संगोपन अत्यंत काळजीपूर्वक आणि समजून उमजून करायला पाहिजे. सर्वात पहिली गोष्ट अशी की ह्या मुलांना फारशा समस्या असणार नाहीत पण हळूहळू समस्या निर्माण होऊन वाढण्याची संभावना आहे. कारण जेव्हा ते समाजाच्या संपर्कात येतील तेव्हा त्यांना निरनिराळ्या प्रकारच्या बाधांची पकड जाणवायला सुरुवात होईल आणि ते त्या व्यक्त करायला सुरुवात करतील. बहुधा उजव्या बाजूचे स्वाधिष्ठान दुर्बल असते कारण मुलं फारच, वाजवीपेक्षा जास्त क्रियाशील, चळवळी असतात आणि स्वस्थ कसं राहावं हे त्यांना माहीत नसतं. अगदी ध्यान करत असतांना देखील मुलं बरीच अस्वस्थ, क्षुब्ध असतात. तर त्यांच्या जीवनात काय समस्या आहेत हे शोधून काढा. मुलांसाठी आई-वडील (पालक) व शिक्षकांचे वागणे कमालीचे महत्त्वाचे असते. मुलांसमोर तुम्ही ओरडून बोलू नये, घाई गडबड करू नये आणि रागवू नये. तर मग ते मूल अधिक शांत होईल. जर ते मूल एक शांत वृत्तीचे मूल नसेल तर लक्षात घ्या की तुमच्यातच काही दोष आहेत. नक्कीच पालकांमध्येच काही तरी दोष, गडबड आहे. नाभीमध्ये असेल किंवा स्वाधिष्ठानात असेल म्हणूनच ते मूल सदासर्वदा बेचैन, अस्वस्थ असतं आणि असंही आहे, की आजूबाजूलासुद्धा क्षोभ, गलबला भरपूर असतो. लोकांचे आपल्या क्रोधावर, स्वभावावर नियंत्रण नाही आणि हे सगळं एकमेकांशी जोडले गेल्यावर आणि गुंतल्यावर मग ती मुलं

विघातक हिंसक होऊन निरंकुशपणे वागायला लागतात. आणि जेव्हा ते आपला हिंसक स्वभाव दाखवू लागतात, तेव्हा ते इतके भीषण असते, की ते असे सैरभैर होऊन धावल्यासारखे का वागतात हे लक्षातच येत नाही. जनावरांच्या कळपातदेखील कधीही असे नसते. चांगले, व्यवस्थित पोशाख असलेले सुसंस्कृत सभ्य लोक, पण अचानक त्यांना काय होतं कोणाला माहीत, की त्यांचा क्रोध अगदी पराकोटीला जाऊन पोहोचतो. एका खेळाची गोष्ट आहे. त्या खेळात एक गोल झाला न झाला तोच त्यांचा पारा चढायला लागला आणि खेळाडूंचा जो संघ सामना खेळत होता, त्यातल्या खेळाडूंशी ते खूपच एकरूप, एकरस झाले आणि त्यांच्या जागी आपण स्वतःच असल्याचं त्यांना वाटू लागलं, त्याअर्थी त्यांचा अहंकारसुद्धा त्या विशिष्ट संघाशी एकरूप झाला. मग काय? ते इतके क्षुब्ध होतात की ते सैरावैरा धावायला लागतात आणि वस्तू इकडच्या तिकडे हालवायला लागतात. मग पोलिस समोर येतात. पोलिस येताक्षणीच त्यांची भीती वाटण्याऐवजी किंवा स्वतःवर ताबा ठेवण्याऐवजी त्यांच्या रागाचा पुनः भडका उडतो.

ह्याबाबतीत सर्वात आधी सुरुवात करायची म्हणजे मी त्यांच्या आई-वडिलांना दोष देईन. कारण आपल्या मुलांना योग्यप्रकारे हाताळण्यास त्यांचे पालक समर्थ ठरले नाहीत. लहान मूल बालपणी फारच चळवळं, अस्वस्थ असतं आणि मग हाच स्वभाव त्यांच्या अंतरंगात बनत राहतो आणि त्यामुळेच मुलं इतकी विचित्रपणानं वागतात की त्या सामन्यात त्यांनी तिथल्या तिथे, जागच्या जागी चाळीस लोकांना जिवानिशी मारले. तिथे कोणते युद्ध नाही, तिथे भांडणतंटा नाही. फक्त तुडुंब राग! आणि तो ही निरनिराळ्या कारणांमधून उपजलेला! हा राग का आणि कसा? हे आपण समजून घेतले पाहिजे. इतका उदंड क्रोध काय म्हणून? त्याचे कारण तरी काय आहे? आम्ही लोक शांत का म्हणून नाही? असं काय आहे, की ज्यामुळे आम्ही इतके क्षुब्ध आणि क्रुद्ध होतो? साधी गोष्ट आहे-हा अहंकारच आहे. पण अहंकार असतांनासुद्धा एवढं समजलं पाहिजे, की तो

एवढा अनावर का बरं आहे की तुमचे जाणते मनदेखील त्याला आवरू शकत नाही? मुलं काय करतात ह्यावर त्यांच्या लहानपणापासूनच लक्ष ठेवायला पाहिजे. जर तुमच्या आज्ञेवर बाधा होऊन पकड आली, तर बिचाऱ्या मुलांना त्रास भोगावा लागतो. प्रौढ लोकांचे वर्तन ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. तुम्ही काही असे लोक नाहीत, की जसे साधु-बाबा असतात, जे कुठेतरी ठाण मांडून बसलेले असतात. तुम्ही सर्वसामान्य लोकच असायला हवे. अति असामान्य आणि विक्षिप्त, उत्तेजित लोकांची मुलेदेखील असामान्य, विक्षिप्तच निपजणार! मग ते साक्षात्कारी आत्मे आहेत हे जरी तथ्य असले तरी काय? ते लहान, क्षुद्र नाहीत, ते स्वत:हूनच सर्व गोष्टी व्यवस्थित सांभाळू शकतात आणि सदैव तुम्हाला आनंदी ठेवू शकतात.

दुसऱ्या लोकांशी दुर्व्यवहार करण्याची परवानगी तुम्ही तुमच्या मुलाला देऊ नये. जसे की, त्यांचे केसच ओढायचे किंवा असलेच काहीतरी भलतेच करायचे! तुम्ही म्हणायला पाहिजे, 'नाही, असलं भलतचं काही करायचे नाही!' त्यांना हाताळण्याची एक पद्धत आहे, की ज्यामुळे तुम्ही आपल्या मुलांना चांगली आणि गोड मुलं बनवाल. मुलांना हाताळणे ही काही कठिण गोष्ट नाही. ही तर एक फारच सोपी गोष्ट आहे. तुम्हाला केवळ एवढंच समजायला पाहिजे, की त्यांच्या काय समस्या आहेत, आपण त्यांच्यासमोर काय समस्या उभ्या करीत आहोत आणि त्यांना कोणत्या गोष्टीचा त्रास आहे. मी एका लहानशा मुलीबद्दल तुम्हाला सांगते. जेव्हा मी पहिल्यांदा तिला पहायला गेले तेव्हा ती सतत रडतच होती. मग मी शोधून काढलं की तिच्या रडण्याचं कारण तिचं आंथरूण होतं. त्या आंथरूणातच काहीतरी गडबड होती आणि आम्ही ते आंथरूण काढून टाकत नाही तोच ती मुलगी ठीक झाली! त्यामुळे अगदी सुरुवातीलाच तुम्ही शोधून काढलंच पाहिजे, की त्या मुलाला कशाचा त्रास होतो आहे. त्याला सुखाने, समाधानाने, आरामात आणि जीवनाचा आनंद सहजपणे अनुवभत राहू द्यात.

## प्रकरण ३

# औदार्याला प्रोत्साहन द्या

मुलांना नेहमी उदार होणं शिकवा. आपल्या घरची एखादी वस्तू जर त्यांनी दुसऱ्या कोणाला देऊन टाकली, तर त्यांच्या उदारपणाबद्दल तुम्ही त्यांची तारीफ केली पाहिजे. अगदी एखादा हिरा जरी दुसऱ्या कोणाला, एखाद्या मुलाला देऊन टाकला किंवा तुमच्या मुलाला दिला गेला तरीही ते प्रशंसनीय आहे. ही गोष्ट वेगळी की मुलाची आई तो हिरा परत देईल. पण आपण आपल्या मुलांची प्रशंसा करू. 'ठीक आहे, तू फार चांगली गोष्ट केलीस, काही तरी दिलेस.' देणे हा फार मोठा गुण आहे. जी मुले आपली सर्व खेळणी दुसऱ्यांना अशीच खेळायला देऊन टाकतात, ती चांगली मुलं आहेत. परंतु जी मुलं आपली खेळणी इतरांना देत नाहीत, स्वत:च्या जवळच ती खेळणी ठेवतात, ती मुलं खरं म्हणजे चांगली नव्हेत. आपण नेहमी त्यांच्या चैतन्य लहरी पाहिल्या पाहिजेत, त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. जोपर्यंत आपण त्यांची चैतन्य स्पंदने पाहत नाही, तोपर्यंत ती मुलं पुढं काय करणार आहेत, हे आपल्याला कळणारच नाही.

तसंच दुसऱ्यांचं कौतुक करण्याच्याबाबतीत! जर ते दुसऱ्यांवर टीका करायला लागले तर त्यांचं बोलणं ऐकू नका. जेव्हा ते दुसऱ्यांचे कौतुक, गुणग्रहण करतील, तेव्हा मात्र ते बोलणं लक्षपूर्वक ऐका. फार महत्त्वाचं आहे. ते दुसऱ्यांवर टीका करतील, पण कधीही कोणा एकाची बाजू घेण्याचा पर्याय स्वीकारू नका. मुलं जर भांडत असतील तर त्यांना भांडू देत. त्यांना थोडंसं भांडू द्या, काही हरकत नाही. त्यांचे प्रश्न सोडवा. परंतु ती मुलं फारच भांडून हमरीतुमरीवर यायला लागली, तर मग दोन काठ्या आणा. 'ठीक आहे, तुम्हाला दोन काठ्या पाहिजेत ना? मारा आता काठ्यांनी

एकमेकांना!' तेव्हा त्यांना खरं कळेल की, ते जे करतात ते भयंकर आहे, त्यांना दोन काठ्या द्या, 'तुम्हाला पाहिजे ना हे? ठीक आहे. घ्या त्या काठ्या हातात! एकमेकांना झकासपैकी ठोकून काढा. जेव्हा तुम्हाला दोघांनाही छानपैकी मार लागेल, जखमा होतील, तेव्हा आम्ही तुम्हाला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊ. अरे, आता या ना, घ्या ना द्या काठ्या!'

शिवाय तुम्हाला हे कळायलाच पाहिजे, की ते का भांडत आहेत. मुलांचं असं एक मानसशास्त्र आहे, की त्यांना स्वतःकडे सर्वांचं लक्ष आकर्षित करून घ्यायचं असतं. समजा एखादा मुलगा शिवीगाळ करीत असेल, तर म्हणा, 'तसलं काही बोलू नकोस. मी तुला त्यासाठी थप्पड मारेन!' तो ते पुनः म्हणेल. परंतु त्यानं पुनः तसं म्हटलं तर त्याबद्दल विसरून जा. तर काहीच होणार नाही. तो मुलगासुद्धा विसरून जाईल. त्या मुलांची सगळी प्रवृत्ती तुमचं लक्ष वेधून घेण्यासाठी असते. कदाचित त्यांच्या स्वभावातल्या गोडव्यामुळे किंवा जे काही असेल ते! परंतु जेव्हा मुलं एखादी चांगली गोष्ट करतात, तेव्हा तुम्ही त्यांच्याकडे आवर्जून लक्ष द्या. म्हणजे ते चांगल्या गोष्टी करायला सुरुवात करतील.

तर अशा प्रकारे प्रेम दोन्ही बाजूंनी कार्य करतं. हे दैवी, देवदत्त प्रेम असतं. आपण प्रत्यक्ष बोलून स्वतःच्या भावना, प्रेम व्यक्त केलं पाहिजे. पण मुलांना हे सांगायलाच लागतं की, ते एकदुसऱ्यांवर कसं प्रेम करतात, ते भेटी, उपहार म्हणून काय देतात! त्यांनी अगदी छोट्या छोट्या गोष्टी घ्याव्यात आणि द्याव्यात. जेव्हा हे कसं करावं हे मुलांना कळतं आणि जेव्हा त्यांना एकमेकांना म्हणायला लागतं, 'मला तुझ्याबद्दल फार प्रेम वाटतं', तेव्हा हे सगळं कसं गोड वाटतं. अशा गोष्टी म्हणजेच बोलण्यासाठी गोड गोड गोष्टी असतील. फारच सुखद! परंतु इकडे तर मुलाला ठाऊकच नाही, की हे असं कशाप्रकारे करायचं! नाही, आतापावेतो त्यानं अशाप्रकारे कोणाशीच बोललेलं नसतं, तसा तो वागलेला नसतो. मग असंच बोलणं

चांगलं आहे. त्यात काय चूक आहे? परंतु कधी कधी ह्या गोष्टींमध्ये अहंकार असतो. तर अहंकार वाढत नाही, वाढायला नको. (त्याला प्रेमाचं वागणं मदत करतं) जे काही आहे, ते हेच तर आहे!

## प्रकरण ४

## आत्मसन्मान

लहान मुलांना आत्मसन्मानाची जाणीव होऊ देणं, आत्मसन्मान म्हणजे काय, हे त्या मुलांना शिकवणं आणि आत्मसन्मानाचं महत्त्व कशाप्रकारे समजून घेणं हीच शिक्षणाची कल्पना आहे. मग ह्याच्याच अनुषंगाने त्यांना वेगवेगळ्या गोष्टी शिकवल्या जाऊ शकतील. जसे की, ‘आपण आपल्या वस्तु योग्य प्रकारे ठेवायला, आपली जागा स्वच्छ ठेवायला आणि ह्या सगळ्यांचा मान ठेवायला शिकलं पाहिजे.’ शाळा, शिक्षक आणि तिथल्या सर्व गोष्टींचा आदर करायला शिकलं पाहिजे. भूमातेचा आदर कसा करावा इथपासून सुरुवात करावी. आधी तुम्ही भूमातेला हाताने स्पर्श करायलाच पाहिजे आणि मग तिच्याजवळ क्षमायाचना करायची कारण की तुम्ही तिला आपल्या पायांनी स्पर्श करीत आहात. एकदा का आत्मसन्मान आला की मग त्या मुलांमध्ये इतर कोणत्याही कल्पनांची जाणीव आणणं सोपं आहे. आपण काही त्यांना नियमांपासून पूर्णपणे मुक्त होऊ देणार नाही किंवा आपण असंही म्हणणार नाही की त्यांना कोणत्याही प्रकारच्या नियमांची किंवा अटींची बांधिलकी नसेलच. नियम, अटी अशाप्रकारे घातल्या जातील, अशा मार्गानं केल्या जातील, की ती मुलं काही विशेष, असामान्य गुणांनी युक्त होतील. असे गुण, की ज्यांची आजच्या जगात आवश्यकता आहे. ते कदाचित मोठेपणी थोर नेते होतील किंवा उत्तम वक्ते, चित्रकार किंवा कलावंत म्हणूनही त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसित होईल आणि त्याची काळजी आपल्यालाच घ्यावी लागेल. परंतु अगदी पहिली आणि अग्रक्रम असलेली गोष्ट म्हणजे अशी की कोणत्याही व्यक्तीला स्वत:चा आदर कसा करावा हे माहीत असायला

पाहिजे.

समजा तुम्ही त्यांना वयाच्या चाळिसाव्या वर्षी आत्मसन्मान शिकवू लागलात तर तुम्ही ते करू शकणार नाही. वयाच्या दुसऱ्या वर्षापासून सहाव्या वर्षापर्यंतच हे करायला हवं. कारण त्याच काळात आत्मसन्मानाचा भाव, स्वच्छतेची जाणीव आणि शिस्तीची भावना आणि नीटनेटकेपणाची जाण त्यांच्यात रुजवून वाढवली जाऊ शकते. दोन ते सहापर्यंतची वर्षे हाच बिलकुल योग्य काळ आहे. 'न नवे भाजने अग्निसंस्कार:' असं संस्कृतात म्हटले आहे. तेव्हा त्या वेळी की ज्यावेळी घडा बनवलेला असतो, पण अजून त्याला भाजायचं नसतं. नंतर आम्ही त्याला भट्टीत टाकतो.

त्याच्या अगदी नुकतेच आधी तुम्ही मुलांवर जे संस्कार कराल, ते तसेच्या तसेच राहतील. पण सर्वात आधी घडा तयार केला जातो. हा काळ म्हणजे तो दोन वर्षांचा होत नाही तोपर्यंतचा होय. दोन ते सहा वर्षे हाच काळ आहे, की तुम्ही त्याला भाजायला तयार ठेवा. परंतु भाजायला टाकण्यापूर्वी तुम्ही त्याच्यावर सगळे संस्कार ठसे उमटवायला पाहिजेत. सहाव्या वर्षानंतर तुम्ही ते भाजायला ठेवा, परंतु त्यापूर्वी सर्व संस्कार त्याच्यावर करा आणि मग भाजायला ठेवा. हे असं आहे ते. लहान मुलाला घडवणं फार सोपी गोष्ट आहे. जसं की मला असं वाटतं की, सहजयोगी घडवणं ही एक फार सृजनशील गोष्ट आहे. निर्माण केल्या जाणाऱ्या गोष्टींमध्ये मनुष्यनिर्मिती ही नितांत कलात्मक गोष्ट आहे. परमेश्वराने निर्माण केलेली सर्वात महान गोष्ट म्हणजे मनुष्य होय. आणि त्यातही मनुष्यमात्रांना काहीतरी अधिक थोर बनवणं हे तर विशेषच मोठं काम आहे.

ह्या वयात मुलांमधील प्रतिभा, कौशल्येसुद्धा तुम्ही हुडकून काढू शकता. त्या मुलाची रुचि, कल कशामध्ये आहे हे तुम्ही शोधून काढू शकता. काहीही झालं तरी त्यांच्यात जी सुप्त कौशल्ये आहेत त्यांना शोधून

काढायला पाहिजे आणि सुरुवातीपासूनच त्यांना प्रोत्साहन द्यायला पाहिजे. काहीही असो, प्रत्येक मुलावर प्रत्येक गोष्ट लादू नका. काही मुलांचं गणित खूपच चांगलं असतं, परंतु काही जणांना गणित येत नाही. परंतु ती व्यक्ती हस्तकलेत हुशार असते. त्याला हस्तकला करू देत.

प्रत्येक ज्ञानाचे मूल्य सारखेच असते. असं काहीच नाही, की, 'हे ज्ञान अधिक वरचे आहे, अधिक उंच आहे.' काहीही असलं तरी ती एक अविद्या आहे. तुम्हाला जे काही वाटतं ते कसं निर्माण करायचं ह्याचं तंत्र फक्त तुम्हाला अवगत असायला पाहिजे, एवढंच काय ते! जेव्हा तुम्ही शिकत असता तेव्हा काही उच्चतर आणि काही नीच प्रतीचं असं मुळीच काही नसतं, मुलाला जे काही आवडतं तेच त्याला करू द्या. त्याला स्वत:लाच ते सगळं सांभाळू द्या आणि अशाप्रकारे प्रत्येक गोष्ट प्राप्त होऊ शकते. समजा, काही लहान मुलांना खोल्या स्वच्छ करण्याची, प्रत्येक गोष्ट स्वच्छ ठेवण्याची, स्वयंपाक करणं अशा गोष्टींची आवड असते. ठीक आहे, ते उपहारगृहाचे व्यवस्थापक-हॉटेल मॅनेजर होऊ शकतात. मुलांमध्ये त्यांच्या आवडीच्या काही गोष्टी शिकण्याची आणि त्यांना उत्तम स्वरूपात निर्माण करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती असते.

## प्रकरण ५

# मुलांना प्रतिष्ठा द्या

सदासर्वकाळ मुलांना अगदी थेट हाणत राहिलं तर त्याला अशा प्रकारचं व्यक्तिमत्त्व मिळतं की त्या व्यक्तिमत्त्वात काहीच ठोस, सारभूत असं ग्रहण आणि धारण केलं जात नाही. आपल्या आई-वडिलांकडून अप्रत्यक्षपणानं संकेत घेऊन त्यांच्या पदराला पकडून तोही त्याचप्रकारे वागू शकेल आणि कालांतराने एक उद्धट व्यक्ती बनू शकेल. परंतु त्याच्याजवळ ती प्रतिष्ठा, ते तेज नसेल, जे केवळ मौन असतं आणि त्या प्रतिष्ठेला अभिव्यक्त करीत असतं किंवा आविष्कृत होत असतं. हे तेज, ही प्रतिष्ठा मूक असायला हवी जी अलगदपणानं अभिव्यक्त होते. जेव्हा लोक अशा उन्नत व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीला पाहतात, तेव्हा पाहतांना म्हणतात, 'अहो काय हा मनुष्य! काय हा रूबाब, तेज आणि प्रतिष्ठा!' आणि अशी माणसं मग समाजासाठी एक आदर्श बनतात.

त्या मुलांना तुम्ही कुठेही ठेवा, ते इतके उत्कृष्ट, प्रतिष्ठित आणि परिपक्व असतील की लोक अगदी थक्क होतील! तुम्ही त्यांना काही सांगावं ह्याची आवश्यकताच राहणार नाही. जर तुम्ही तुमचं घर अगदी स्वच्छ ठेवाल आणि त्याची काळजी घ्याल, तर मग मुलं स्वत:च ते स्वच्छ करतील. त्यांना ते आवडेलही. कारण मुलं म्हणजे खरोखरच उमलणाऱ्या कळ्यांची सुंदरता आहे. जेव्हा आपण त्यांना कापतो, तोडतो, तेव्हा अगदी मुळाशी तोडतो. जेव्हा मुलं प्रतिष्ठित, भारदस्त असतात, तेव्हा ती बिघडवली जात आहेत, हे मी कधीच पाहिलेले नाही.

## प्रकरण ६

# प्राकृतिक गुणविशेष

एक लहानसा मुलगा अगदी कमी वेळात किती तरी शब्द शिकतो. तेवढ्या वेळात आम्ही नाही शिकू शकत! नंतर जेव्हा आपलं वय वाढून आपण मोठे होतो तेव्हा तुम्हाला फक्त तीन वाक्य जरी शिकायची, पाठ करायची असतील, तरी ते अशक्य आहे. मूल वाढत असतं आणि त्याची जिज्ञासा आणि जास्त गोष्टी जाणून घेण्याची त्याची क्षमतादेखील फारच तीव्र असते आणि तो अधिकाधिक शिकायला सुरुवात करतो. तो असा कधी विचार करीत नाही की त्याला प्रत्येक गोष्ट माहीत आहे. जे कोणी ह्यासारखा विचार करतात, त्यांचा उचित प्रकाराने जन्मच झालेला नाही. 'मला काहीच माहीत नाही, मला ते सगळं जाणून घेतलं पाहिजे,' अशाप्रकारे आपण नम्र व्हायला पाहिजे. आपल्याला भरपूर जाणून घ्यायचं आहे आणि जिथून कुठून आपल्याला जाणून घ्यायचं आहे तेदेखील आपल्याला माहीत असायलाच पाहिजे.

उद्धटपणा, आपल्याला भरपूर माहीत आहे ही कल्पनाच, सुयोग्य वाढ होण्यासाठी धोक्याची आहे. म्हणून ही धारणाच आपण सोडून दिली पाहिजे. आपल्याला माहीत असायला पाहिजे, की आपण काहीच करीत नाही. लहान मुलगा कधीही एक मूर्ख व्यक्ती नसतो. तो कोणतीही गोष्ट बावळटासारखी करीत नाही. उलट कोणी बावळटपणा करायला लागलं की मुलं म्हणतात, 'हा तर विदूषक आहे!' त्यांना असला मूर्खपणा आवडत नाही. ह्या माणसाला काय झालं आहे याचंच त्यांना नवल वाटतं.

लहान मुलांना गबाळ्यासारखं अव्यस्थित रहायला बिलकुल आवडत नाही. एक मुलगा आंघोळीला गेला होता आणि आंघोळ करून परत येत होता. त्याच्या वडिलांची इच्छा होती, की मला पाहण्यासाठी, भेटण्यासाठी

त्याला आणावं. तो म्हणाला, ‘नको, माझे कपडे काही ठीकठाक नाहीत. माझे सगळे केस विस्कटलेले आहेत. मी श्रीमाताजींच्या दर्शनाला असा कसा जाऊ? म्हणून तो परत गेला. त्यानं केसांना व्यवस्थित तेल लावलं. आणि पोशाख देखील नीटनेटका आणि झकास केला.

आम्ही जेव्हा लहान होतो तेव्हा आम्हाला नेहमीच माहीत असायचं, की पाश्‍चात्य लोक नेहमीच व्यवस्थित, टापटीपीच्या वेशात असतात. कारण त्यांना तशा प्रकारचं व्यवस्थित वळणच लावलं गेलं आहे. अस्ताव्यस्त, विखुरलेल्या केसांनी ते कधीही येणारच नाहीत. तरीदेखील तो मुलगा म्हणाला, ‘नको, माझे केस विस्कटलेले आहेत. अशा अवस्थेत श्रीमाताजींच्या दर्शनाला मी कसा जाऊ शकतो?’ म्हणजे असं की आपल्याला फॅशन्सच्या सगळ्या विचित्र कल्पना आणि त्यासारख्याच इतर गोष्टीही सोडून द्यायला पाहिजेत. कारण हे सगळं निघून जाणार आहे. तुमचे केस गळतील. तुम्हाला सगळ्यांना डोक्याला टक्कल पडेल आणि तुम्ही खूपच मजेदार दिसाल. ह्यात मुळीच शहाणपणा नाही. पण लहान मुलांमध्ये शहाणपणा असतो, तो विस्कटलेल्या केसांनी, असा तसा यायचाच नाही. त्यानं अगदी व्यवस्थित प्रकाराने योग्य कपडे घातले आणि मग तो माझ्यासमोर येऊन उभा राहिला. मग आपल्याला हे समजून घ्यायला पाहिजे, की आमचं बाह्य रंगरूप आमच्या अंतरंगाला अभिव्यक्त करतं. आम्हाला काही विशिष्ट गोष्टी कराव्याच लागतात. कारण ह्या गोष्टींव्यतिरिक्त इतर गोष्टी कशा स्वीकाराव्यात हे आम्हाला माहीतच नाही किंवा लहान मुलगा एखादी गोष्ट जशी करतो. तशी करायला येत नाही, जमत नाही. आम्हाला जर तुम्ही लहान मुलाला एखादी गोष्ट करायला सांगितली, तर तो त्या आज्ञेचं पालन करतो, अगदी लक्षपूर्वक ऐकतो. असं जर नसेल तर तो सामान्य, इतर मुलांसारखा मुलगा नाहीच. परंतु तुमच्या स्वतःच्या मुलांच्याबाबतीत तुम्ही फार म्हणजे फारच काळजी घेतली पाहिजे. तुम्ही

त्यांना उवांनी डोके भरलेले गबाळे किंवा लोटस ईटर्ससारखे मंद, सुस्त किंवा ज्यांच्यात मुळीच नीटनेटकेपणा, टापटीप आणि चटपटीतपणा नाही अशा लोकांसारखं होऊ देऊ नका. ते सर्व सहजयोगी आहेत त्यामुळे तुम्हाला त्यांच्यासारखेच, त्याच पद्धतीने असायला पाहिजे.

लहान मुलाचा दुसरा एक प्राकृतिक गुणविशेष असा आहे, की तो नेहमी प्रत्येक गोष्टीचं मूळ तत्त्व अर्थात मर्माचा वेध घेतो. लहान मुलगा प्रत्येक गोष्टीतलं तत्त्व नेमकं पाहतो आणि कधी कधी मुलं जे प्रश्न विचारतात ते अगदी लक्षणीयतेने सामूहिक असतात. मला तर अगदी नवल वाटतं की तिथपर्यंतच ज्ञान त्यांना कसं मिळालं, मुलं तिथवर कशी पोहोचली. किरकोळ आणि निरर्थक गोष्टींमध्ये ते वेळच घालवत नाहीत आणि फालतु गोष्टींबद्दल बोलतसुद्धा नाहीत. मी लहान मुलांना कपडे किंवा घराबद्दल बोलतांना पाहिलेले नाही. ते काही तरी रचनात्मक काम करण्यात गुंग झालेले असतात. तुम्ही त्यांना विचारता, 'तुम्ही काय करीत आहात?' ते म्हणतात, 'असं बघा, संपूर्ण विमानतळ किंवा आख्खी मुंबई बांधून टाकीत आहोत.' त्यांच्या कामाचा आवाका अशा प्रकारचा असणार. ती अत्यंत कार्यमग्न मंडळी आहेत. साक्षात्कारी आत्मे जर लहान मुलं असतील, तेव्हा जर तुम्ही त्यांना पहाल तर त्यांना नेहमी सामूहिक असण्याबद्दल काळजी असते. जर तुम्ही एखाद्या मुलाला म्हटलं, 'तू एक सहजयोगी आहेस.' तर तो म्हणेल, 'होय, मी एक सहजयोगी आहे. मी ते करू शकत नाही'.

जेव्हा मुलांमधला अहंकार वाढतो, तेव्हा अशाप्रकारचा मूर्खपणा सुरू होतो आणि मग ते विचित्रपणाने वागायला सुरुवात करतात. लहान मुलं परमेश्वराने त्यांना जे दिले आहे आहे, ते सहज स्वीकारतात. त्यांच्यासाठी दक्षता, सावध असणं इतकं नैसर्गिक आहे. जर एखादं विमान त्यांनी जातांना पाहिलं तर ते म्हणतील, 'बाय, बाय विमानराव!' मग काही बोटी, नावा ते जातांना पाहतील तर ते म्हणतील, 'बाय, बाय!' समुद्राला ते म्हणती, 'ठीक

आहे सागरा, आम्ही उद्या येऊ आणि तुला भेटू.' असं पाहा, प्रत्येक गोष्ट त्यांच्या मनाच्या आत आहे. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक गोष्ट आहेच. ते येतात आणि तुम्ही त्यांना विचारता, 'तुम्हाला ते आवडलं ना? कसं?' ते म्हणतील, 'ओहो, आम्हाला गवत, हिरवळ खूपच आवडली. इतकी सुंदर आहे ती.' आणि ते तुम्हाला प्रत्येक गोष्ट सांगतील. प्रत्येक गोष्टीसंबंधी बारकावेसुद्धा सांगतील. इतके तत्पर! आणि नंतर ते म्हणतील, 'अहो, तुम्ही हे का बरं केलं नाहीत? तुम्ही थोडी फुलं इथे ठेवू शकला असता. तुम्ही काही फुलबाग केली असती तर झोपडीसाठी ती सुंदर दिसली असती.' किंवा असंच काही तरी-ते एखादी गोष्ट सुचवतील.

लहान मूलं फार जास्त विचार करीत नाही. तो फार जास्त योजनादेखील करत नाही. प्रत्येक गोष्टीतून काही गंमत तो ओळखून काढतो. लहान मुलांचे स्नायु फारच लवचिक असतात. ते सतत प्रतिक्रिया देत असतात. मुलं कधी कधी जेव्हा खुश असतात किंवा जेव्हा कधी कधी नाखुश असतात, तेव्हा कसंही असलं तरी त्यांचे स्नायु नेहमीच त्यानुसार कार्य करीत असतात. कोणावरही ताण नसतो. त्यामुळेच आम्हाला आमच्या चेहऱ्यांच्याबाबतीत समस्या आहेत. कारण आम्ही आमचे चेहरे एकाच ढंगात ठेवतो. आजकालच्या दिवसात तर तुम्ही जितके जास्त दुःखी, उदास असाल, तितके तुम्ही अधिक देखणे मानले जाता! इथंच सगळं संपलं किंवा काही लोक सदासर्वकाळ हास्यच करत राहतात-अगदी असं! फारच वाईट आहे हे! किंवा नेहमी अगदी नाखुश राहणं, हे देखील! तुम्ही आपल्या भावनांच्या क्रिया-प्रतिक्रिया तुमच्या चेहऱ्यावर प्रकट होऊ दिल्या पाहिजेत. अशा व्यक्तिमत्त्वाचा काय उपयोग की ज्याला आपल्या कोणत्याही भावना कशा दाखवाव्यात हे देखील माहीत नाही? तुम्ही काही एखादा दगड नाही, आहात का? आपण स्मितहास्य करायला पाहिजे. आपण नैसर्गिकपणे हसायला पाहिजे, खोटं खोटं नको आणि आम्ही लोकांशी सहज, स्वाभाविकपणानं बोललं पाहिजे.

## प्रकरण ७

## अनुशासन

पहिली गोष्ट म्हणजे अनुशासनाच्या नावावर लहान मुलांवर खूप जास्त बंधन किंवा मर्यादा मला टाकावयाच्या नाहीत. कारण मुलं स्वतःच स्वतःहून अनुशासित असतात. परंतु शिस्त म्हणजेच अनुशासन असायलाच पाहिजे. जर तुम्ही सकाळी लवकर उठण्याचा परिपाठ चालू ठेवला तर हळुहळु तुम्हाला आढळून येईल की त्या ठराविक वेळेनंतर मुलंदेखील झोपून राहू शकत नाहीत. ह्या सर्व चांगल्या सवयी लावल्या जाऊ शकतात. लवकर निजणे, लवकर उठणे, जास्त बडबड न करणे किंवा बिलकुल मुक्या बहिऱ्यासारखे न होणे, घाणेरडे न बोलणे, गंभीर गोष्टींना फुटकळ, फालतू न समजणे आणि कटु, उपरोधिक न बोलणे ह्या चांगल्या सवयी आहेत. ह्या सगळ्या गोष्टींवर फार काळजीपूर्वक लक्ष देता येऊ शकते.

कसं वागायला पाहिजे हे मुलांना त्यांचं त्यांनाच कळायला पाहिजे. कसं उत्तर द्यायला पाहिजे, कितपत बोलायला पाहिजे हेही त्यांना माहीत असायलाच पाहिजे. त्यांना सारख्या भेटवस्तू किंवा उपहार देऊन बिघडवू नका. त्यांना अगदी योग्य वेळीच भेटवस्तू द्या आणि त्यांनी कसं वागायला पाहिजे हे त्यांना सांगा. त्यांना शिस्त लावणं हे तुमचं कर्तव्य आहे. कोणत्याही लहान मुलाला उलट उत्तर देण्याची परवानगी दिली जाऊ नये. दुसऱ्यांशी आदरानं, सन्मानानं वागण्याची शिकवण त्यांना द्या. जर तुम्ही त्यांना तसं शिकवलं नाहीत तर ते इतरांचा अनादर करतील. त्यांच्याजवळ एक तासभर बसा आणि दुसरं कोणी हजर नसतांना त्यांच्याशी बोला. त्यांना सांगा, 'तुम्ही तर राण्यांसारख्या आहात. राजांसारखे आहात.' त्यांच्यात आत्मसन्मान ओतप्रोत भरा, तर मग ते योग्यप्रकारे वागतील आणि

तशाप्रकारे कसं वावरावं हे शिकतील.

जर त्यांनी खेळणी तोडली आणि असंच काही केलं तर त्यांना सांगा, 'जर तू खेळणी तोडत राहशील तर तुला ती मिळणार नाहीत.' ह्या खेळण्यांना योग्यप्रकारे ठेवा, त्यांचा योग्य क्रम लावून व्यवस्थित करा आणि हे सगळं त्या मुलांना आपणहून संघटित करू द्या. तुम्ही मुलांना अशाप्रकारे प्रशिक्षण द्या, वळण लावा. त्यांना थोडीफार खेळणी द्या, पण ती कुठं आहेत तिकडे लक्ष द्या. त्यांना खेळण्यांची यादी द्या आणि त्यांना समजावं म्हणून त्यांना ती यादी ठेवायला लावा. आदर! आदर हीच त्यातली खरी गोष्ट आहे. आपण आपल्या स्वत:च्या ज्या वस्तू आहेत, त्यांचा मान ठेवत नाही. आपण त्या वस्तूंना केवळ लाडावण्यासाठी घेतो. आपण आपले कपडेदेखील इकडे तिकडे भिरकावतो. ह्याच कारणामुळे मुलांनादेखील शिस्त नसते. ते आपले कपडे इतस्तत: फेकतील. वाट्टेल तसे अगदी अव्यवस्थित!

मुलांनी दुसरी सवय अशी लावून घ्यायची आहेआणि त्यांनी सकाळी झोपेतून लवकर उठायचं आणि प्रातर्विधी पार पाडायचे. त्यासाठी आई-वडिलांनीही सकाळी लवकर उठायला पाहिजे. त्यांना आंघोळ घाला, त्यांना तयार करा. मुलांना चहा देऊ नका, दूध द्या. चहाची सवय चांगली नव्हे. तुमची मुलं सोळा वर्षांची होत नाहीत तोपर्यंत तुम्ही त्यांना प्रत्येक गोष्ट सांगायलाच पाहिजे. चांगलं काय आहे, सदाचरण, न्याय्य वर्तन काय आहे, कसं वागायला पाहिजे आणि कसं जगायला पाहिजे. नाहीतर ते मन मानेल तसं वागतील भटकतील, भरकटतील. ते विचार करतात, 'ओह, आम्हाला जे पाहिजे, ते आम्ही करू शकतो. त्यात काय चुकीचं आहे?' मग चुकीचं काय आहे, हे तुम्ही त्यांना सांगून शिकवायला पाहिजे. त्यांना पैसे देऊ नका. त्यांना काम करू द्या. तुम्ही तुमच्या मुलांना त्यांच्या कामाबद्दल कधीही पैसे देऊ नयेत. जर ते काम करतात तर ते स्वत:साठी करत असतात. त्यांनी काही काम केल्याबद्दल त्यांना पैसे देणं ही फारच वाईट सवय आहे. ते मजूर

नाहीत. असं सगळ्या प्रकारचं प्रशिक्षण दिलं गेलंच पाहिजे.

सदान्कदा मुलांच्या मागं मागं धावत राहू नका. कारण एकदा का त्यांना कळलं, की ते तुमच्यावर वर्चस्व गाजवू शकतात, तर मग ते तुमच्या डोक्यावरच बसतील. तुम्ही बरोबर असतांना त्यांचं स्थान कुठं आहे, हे त्यांना कळलं पाहिजे. हळूहळू ते शिकतील आणि व्यवस्थित वागायला लागतील. तुम्ही एकतर त्यांना मनुष्य बनवा नाहीतर सैतान बनवा. ते तुमच्या हातात आहे. प्रसंगवशात्सुद्धा तुम्ही कठोर होऊ नये आणि तरीदेखील काहीही झालं तरी त्यांना तुमच्यावर कोणत्याही मार्गानं वर्चस्व गाजवू देऊ नये.

मुलांना माहीत असायला पाहिजे, की तुम्ही त्यांच्यावर प्रेम करता. अगदी छोट्या छोट्या गोष्टी अशा करा की, ज्यातून दिसेल, की तुम्ही त्यांची काळजी करता. मुलांना केवळ एकच भीती असते, की ते तुमचं प्रेम गमावून बसतील. प्रेम अभिव्यक्त केलं गेलंच पाहिजे. प्रेम ही एकच अशी मुख्य गोष्ट आहे, की मुलांना नेहमी दिली जाऊ शकते आणि तुमच्याकडून त्यांचा नेहमी आदर केला गेला पाहिजे. ते म्हणजे कोणीतरी वरच्या स्तरावरची व्यक्ती आहे अशा प्रकारे त्यांना संबोधित करा. आदर आणि प्रेम, हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यांना ठोक देण्यापेक्षा फार बरा! पहिली प्राथमिकता आहे, की त्यांना भरपूर प्रेम देणं, नंतर येते शिस्त!

मुलांनी स्वत:च सवय लावून घेण्याची संमती देऊ नये. फार आराम आणि सुखसुविधांची सवय त्यांना लागायला नको. त्यांनी दुसऱ्यांचीही सेवा करावी, दुसऱ्यांसाठी वस्तू आणून द्याव्यात आणि नेहमी कोणाबरोबर तरी कामात गुंतलेले असावे. पण मुलांना आपण कामासाठी फार कठीण, कठोर श्रम करू देऊ नयेत.

भारतात, संपूर्ण समाज मुलांच्या अवधानाला असं वळण लावतो, की

सतत योग्य आणि बरोबर गोष्टी कोणत्या आहेत ह्याकडेच त्यांचं लक्ष वेधलं गेलं पाहिजे. मुलाला सतत अस्वस्थ, क्षुब्ध राहायला लावून जसं काही एखाद्या स्पर्धेत प्रवेश करत असल्यासारखं वाटायला लावणं हा काही शहाणपणा नव्हे. मुलाला नैसर्गिकपणे सामान्य मुलासारखं वाढू द्या. फार सहज सोपं आहे ते!

## प्रकरण ८

## अन्न

खाण्या-पिण्याच्याबाबतीत मुलांनी फार कांगावाखोर आणि चिकित्सक असू नये, हे त्यांना लहानपणापासूनच शिकवायला पाहिजे. कारण जर तुम्ही त्यांच्या खाण्याबाबत भलतेच चिकित्सक असाल तर मुलंही तशीच आरडाओरडा करणारी असतात. पण तुम्ही जर त्यांच्या खाण्यापिण्याच्या बाबतीत एवढं अवडंबर माजवलं नाही तर तुम्ही जे काही खायला द्याल ते मुलं खाऊ शकतात. अर्थातच अन्न किंवा खाणं स्वादिष्ट, चांगलंचुंगलं आणि अशाच कोणत्यातरी प्रकाराचं पाहिजे. ह्याचा अर्थ असा नाही, की मुलानं खाण्याच्या बाबतीत एवढं आकांडतांडव करावा, की नंतरच्या आयुष्यातसुद्धा एक तर अशा प्रकारचं किंवा तशा प्रकारचं अन्न पाहिजे. मुलाला सगळ्या प्रकारच्या जेवणाचा, अन्नाचा आनंद घेता यायला पाहिजे.

लहान मुलांना आरोग्यसंपन्न बनवेल असं अन्न आपण त्यांना देऊ. मी काही अशा प्रकारची व्यक्ती नाही, की जसे की गांधीजी! गांधीजी आम्हाला नेहमी फक्त उकडलेलं अन्न आणि त्यावर मोहरीचं तेल असंच अन्न खायला देत असत. कारण त्यांचं म्हणणं असं होतं की अशाचप्रकारे तुम्ही अनास्वाद रुजवता आणि वाढवता. 'आस्वाद' (चव), ते म्हणत असत, की चविष्ट रुचकर वस्तु तुम्ही खाऊ नये. मात्र आपण मुलांच्याबाबतीत इतकं कठोर असू नये. गांधीजींच्या आश्रमात राहून नंतर त्यातून बाहेर पडलेले लोक फार कठोर, वाजवीपेक्षा जास्त कडक असतात. पण दुसऱ्यांशी फारसे अनुकूल, जुळवून घेणारे नसतात. ते स्वत:च्या बाबतीत इतके निर्वाणीचे कठोर असतात, की दुसरे लोक त्यांना समजू शकत नाहीत. मुलांनी मोठं होऊन

असं व्हायला पाहिजे, की ते दुसऱ्यांचे समानधर्मी, मिळतेजुळते असतील, आणि दुसऱ्यांशी कसं वागावं, त्यांच्याशी व्यवहार कसा करावा हे त्यांना कळेल. हिमालयात जाऊन बसणंही नको आणि दुसऱ्या कोणाला स्पर्शदेखील करायचा नाही, असंसुद्धा नको. त्यांचं पालनपोषण अशाप्रकारे करायला पाहिजे, की इतर मुलांसारखे सामान्य होतील. ह्याचा अर्थ असा नाही, की त्यांनी सर्व कच्चंच खाणं खावं आणि आरोग्यदायी अन्नाचंच सेवन करावं, पण नेहमीचं सामान्य, चांगलं अन्न खावं ज्यामुळे त्यांचं आरोग्य सुधारेल. आरोग्य सुधारण्यामागे आणखी एक कारण असं आहे, की तुम्ही तुमच्या जेवणाखाण्याच्या वेळा पाळल्या पाहिजेत. सकाळच्या वेळेला तुम्ही त्या मुलांना खाण्यापिण्याच्याबाबतीत फारच आवडनिवड देता. म्हणता, 'तुला खायला काय लागेल बाळा?' हे बिलकुल चालायचं नाही. प्रत्येक मुलासाठी जे काही योग्य आहे ते तर प्रत्येकाने खाल्लंच पाहिजे. तुम्ही विचारता, 'तुला काय हवं आहे?' ते म्हणतील, 'मला भात पाहिजे.' दुसरा एखादा म्हणेल, 'मला ही गोष्ट पाहिजे.' खरं तर कसला फरक आहे? सगळं सारखंच आहे, तेच आहे. 'मला पॉपकॉर्न हवेत, मला ते हवं!' सगळं म्हणजे अहंकार वाढवण्याचा प्रकार आहे. ह्यामुळेच लोक अहंकारग्रस्त किंवा अहंकारप्रवण होतात. अचानक ते अहंकाराच्या वारूवर उडी मारून स्वार होतात. जर तुमच्याशी कोणी प्रेमाने, दयाळूपणाने वागलं तर तुम्हाला उपकृत झाल्यासारखं वाटलं पाहिजे आणि असंही वाटायला हवं, की ते तुमच्याशी किती कोमलपणाने, दयेने वागले. त्याऐवजी अहंकार घोड्यावर स्वार झालेल्या ह्या महाभागांना वाटतं, 'अहाहा, मी तर संपूर्ण जगाचा स्वामी असलो पाहिजे.' असंच होतं. त्याचं हेच कारण आहे, की अगदी लहानपणापासून त्यांनी स्वतःवर संयम ठेवलेला नाही.

सकाळी जे काही खायला बनवलेलं असतं, तेच त्यांनी घ्यायला हवं. आपल्या मुलांना आपण कसं सांगायचं हे तुम्ही शिकायलाच पाहिजे.

‘खातांना जमिनीवर काही जर पडलं, तर तू ते पटकन् उचल आणि फेकून दे आणि तुझे हात धुवून घे.’ आम्ही फक्त एवढंच म्हणतो, ‘नाही, नाही ते (खाली पडलेलं) खायचं नाही.’ खातांना तोंडातून जर काही खाली पडलं, तर तुम्ही ते उचलायला नको. तुम्ही जर अगदी त्याच्या मागं लागून अगदी कडवेपणाने हे केलं नाही, तर आजूबाजूला असलेल्या सर्व प्रकारच्या संसर्गदोषांपासून तुम्हाला तुमच्या मुलांना वाचवता येणं शक्य नाही.

## प्रकरण ९

# मुलांनी स्वाभाविकपणेच सामूहिक असावयास पाहिजे

आंटी-अंकल अशा प्रकारचा नातेसंबंध प्रस्थापित करावा लागतो. असं नाही, की फक्त तुमचे वडील आणि आईच महत्त्वाचे आहेत. लहान मुलं फार स्वतंत्र वृत्तीची असतात. ते आपली स्वत:ची काळजी घेऊ शकतात आणि स्वत:च जे काय असेल ते सांभाळू शकतात. त्यांना केवळ खुश ठेवण्यासाठी तुम्ही त्यांना अशाप्रकारे समजता आणि वागवता! नाही, असं बिलकुल नाही. तुम्हाला समजायला पाहिजे, की मूल अत्यंत बुद्धिमान असतं आणि सामूहिकतेला तुम्ही ज्याप्रमाणे समजून घेतलेलं आहे, त्यानुसार तुम्हाला त्या मुलाच्या मनाला वाकवावं, वळवावं लागतं आणि जर तुम्ही ते केलं नाहीत तर ती मुलं बाकी इतर मुलांसारखी सैरभैर, स्वच्छंदी आणि आपल्या मनाला वाटेल तसं वागणारी होतील.

आपल्या मुलांना प्रेमाने शिस्त कशी लावावी हे तुम्ही शिकलंच पाहिजे. ते कार्यक्रमात शांतपणाने का बसू शकत नाहीत? त्यांना काय समस्या आहे? अगदी प्रारंभापासूनच चैतन्य लहरींचा अनुभव घ्यायला त्यांना लावलंच पाहिजे. त्यांना दुसऱ्या लोकांबरोबर बसायला लावलं पाहिजे. ते ह्या कारणाने की, मुलांना वाटतं, की त्यांचे आई-वडील त्यांचे स्वत:चे आहेत, पण उरलेले मात्र तसे नाहीत. तर वंशविद्वेष अशाप्रकारे अंकुरित होतो आणि वाढीला लागतो. कारण ते असा विचार करतात, की जे लोक गोरे नाहीत ते सामान्य लोक नव्हेत. असा सुरक्षित वाटणारा आणि एकलकोंडेपणाचा स्वभाव मग वाढत राहतो. मग तुम्ही त्यांना तुमच्या जवळच केवळ ठेवत राहता. उलट तर असं व्हायला पाहिजे, की प्रत्येकाशी बोलून आणि प्रत्येकाजवळ आपलं अंत:करण उघडं करून, तुम्ही त्यांना

मुक्त, खुल्या मनाचे होऊ द्यात. अगदी वयानं वाढलेल्या लोकांचाही दुसऱ्यांच्या मुलाला हात लावतांना थरकाप उठतो. 'ते विचारतात, 'मी ह्या मुलाला उचलून घेऊ की नको?' त्यात काय नुकसान आहे? भारतात जर तुम्ही कोणाच्याही घरी गेलात तरी ते अगदी सहजपणाने मुलाला उचलून घेतील आणि आता ते लोक म्हणताहेत की, रोगांपासून रक्षण व्हायला आणि अशाच सगळ्या गोष्टींसाठी ते असं करतात. पण उलट तर असं आहे, की ह्या मुक्त राहण्याने मुलांमध्ये रोगप्रतिकार शक्ती विकसित होते.

वाजवीपेक्षा जास्त संरक्षणात ठेवल्या गेलेल्या मुलांची अवस्था फार धोक्याची असते. कारण कोणत्याही गोष्टींचा, संसर्गाचा अभाव असण्याची परिस्थिती त्यांच्या बाबतीत कधीच नसते. कल्पना करा, त्या देशात सर्वप्रकारचे परोपजीवी प्राणी जगत आहेत. तरीदेखील आम्ही अधिक चांगल्याप्रकारे विद्यमान आहोत. कारण अनेक गोष्टींच्या संसर्गापासून आम्ही मुक्त आणि सुरक्षित आहोत. अशाच प्रकारे आरोग्याच्या दृष्टीने लोक अत्यंत दुर्बल होतात. जर सदासर्वदा मुलांना बंदिस्त ठेवलं, मोकळं राहूच दिलं नाही, तर ते स्वार्थी होतात. अत्यंत अशक्त आणि संकुचित दृष्टीचे होतात. त्यांना बाहेर येऊन मोकळं राहू द्यात. नाहीतर एखादा अधिकार गाजवणारा जास्त बलवान मनुष्य येईल, तुमच्या मुलाला पकडून आपल्या ताब्यात घेईल आणि तुमच्याकडून पैसे उकळण्यासाठी तुमच्या मुलाचा उपयोग करेल, आणि असलं आणखी काहीबाही करेल. परंतु तुम्ही फक्त आपल्या मुलाला आजूबाजूला प्रत्येकाशी खेळू द्या, नुसती परवानगी देऊन खेळू द्या. रोगदेखील त्यामुळे अदृश्य होतील.

दुसऱ्या लोकांवर विश्वास ठेवून आपण आपल्या मुलांना त्यांच्याजवळ ठेवलं पाहिजे. नाहीतर मुलं इतकी एकलकोंडी बनतात, की ती तुम्हाला चिकटूनच राहतात, ती दुसऱ्या कोणाकडे जाऊच शकत नाहीत. भारतात जेव्हा तुम्ही एखाद्या घरी जाता तेव्हा तुमचं स्वागत करायला

पहिल्यादां मुलंच असतात. मुलं म्हणतील, 'ठीक आहे, आपण बसा.' नंतर ते तुम्हाला काहीतरी देतील. जरी घरात दुसरं कोणी नसलं तरी ते तुमच्याकडे बरोबर लक्ष देतील, तुमची काळजी घेतील. त्यांना तुमच्याबद्दल प्रत्येक गोष्ट माहीत असते. तुम्ही काय म्हणालात, तुम्ही काय मागितलंत, तुम्हाला काय पाहिजे होतं इ.इ. कित्ती गोडवा! मी अशा मुलांना भेटले, की ज्यांच्या लहानपणी मी त्यांचं पालनपोषण केलं होतं, त्यांची काळजी घेतली होती आणि मी त्यांना जे काही सांगितलं होतं, ते त्यांना सगळच्या सगळं आठवतं. त्यांना मी सांगितलेल्या गोष्टी आणि मी त्यांची कशी काळजी घेत होते, हे आठवतं. प्रत्येक लहानसहान गोष्ट त्यांना आठवते. त्यांना अजूनदेखील त्या सर्व गोष्टी आठवतात, हे माहीत होणंच किती गोड आहे!

परंतु तुम्ही त्यांना उघडं पाडू नका. त्यांचं प्रदर्शन आणि अवमानदेखील करू नका. तुम्ही मुलांवर जरा जास्त सत्ता गाजवता आणि नंतर त्यामुळे मुलं तुमचं लक्ष नेहमी त्यांच्याकडे ओढून, आकर्षित करून घेण्याचा प्रयत्न करतात. ते दहा प्रश्न तुम्हाला विचारतील आणि फारच बडबड करतील. ते गोष्टी सांगत राहतील, इतक्या, की तुम्हाला थकवा येईल. मला माहीत आहे ते! जेव्हा एकदा मी आगगाडीने प्रवास करीत होते, तेव्हा माझ्याबरोबर एक बाईदेखील प्रवास करीत होती. ती माझ्याबरोबर आणि तिच्या मुलाबरोबर प्रवास करीत होती. त्या आईला तिच्या मुलाबरोबर बोलावं लागत होतं, त्याला गोष्टी सांगाव्या लागत होत्या. मी म्हटलं, 'तसं करू नका. तुम्ही त्या मुलाकडं फारच लक्ष देत आहात. त्याला काय म्हणायचं आहे, काय पाहिजे आहे हे खोदून खोदून काढत आहात आणि त्यामुळेच तुमचं लक्ष सतत त्याच्याकडे राहावं असा त्याचा हट्ट आहे. त्याला खेळायलाच हवं, त्याला स्वत:बरोबर खेळायला हवं. त्याला स्वत:बरोबर असायला हवं. मगच तो सुधारेल.' बिच्चारी आई! काय करावं हे तिला माहीत नव्हतं आणि ती सारखी त्या मुलाला खुश ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. फक्त एवढंच लक्ष

देण्यासाठी की मुलगा खुश आहे आणि अधूनमधून अडथळे नाही आणत आहे! पण हा काही खरा उपाय, मार्ग नव्हे. बस, फक्त बोलू नका, फक्त बोलणं थांबवा.

आणि मुलांनी विचारलेल्या प्रश्नांच्या बाबतीतसुद्धा मुलांना कधीही 'का?' हा प्रश्न विचारू देऊ नये. सारखं तुम्हाला काही काही विचारत राहायचं हे काही त्यांचं काम नव्हे. ते फारच चुकीचं आहे. त्यामुळे अगदी लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये भला मोठा अहंकार उद्भवतो. 'का?' म्हणून ते कशाबद्दल विचारत आहेत? त्यांना प्रत्येक गोष्टीबद्दल का बरं जाणून घ्यायचं आहे? हळूहळू प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट कळतेच. जसं तुम्ही रस्त्याने जात असतांना ते विचारतील, 'हे काय आहे?' रस्त्यावर असणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल सांगण्याची जरूरच नाही. ते जेव्हा मोठे होतील तेव्हा त्यांना त्याबद्दल माहीत होईलच की! त्यांना प्रत्येक गोष्टीबद्दल टुमणं लावण्याची, त्याच त्याच गोष्टीबद्दल पुनः पुनः हट्ट करून विचारण्याची खोडच लागते. अगदी सारखं सारखं विचारून चीड आणायची असाच त्यांचा स्वभाव बनतो, की तुम्ही म्हणायला पाहिजे की हे झाड आहे, हे अमुक आहे, हे तमुक आहे वगैरे. अगदी नंतरसुद्धा वयाने मोठे झाले तरी त्यांना तुम्हाला सांगत रहावं लागतं. त्यांना त्यांच्या लहानपणी ह्या गोष्टीसुद्धा सांगण्याचा काय उपयोग आहे, की ज्या ते विसरणार आहेत? फार जास्तीचं ज्ञान आणि त्यानं डोकं तुडुंब भरून टाकणं, सुई खुपसून ज्ञानाचं इंजेक्शन देणं, हे बिलकुल आवश्यक नाही. खूप जास्त ज्ञान ठासून ठासून भरून मुलांना जबरदस्ती करू नये. कारण तुम्ही त्यांच्या डोक्यात खूप सारं ज्ञान कोंबून कोंबून घातलं, तर तेदेखील गोंधळात पडतील आणि मग त्यांना त्रास होईल. ते जसे आहेत तसेच त्यांना राहू देत आणि जे काय आवश्यक असेल. तेच त्यांना सांगा. अगदी लहान वयात आपण त्यांना खूप अनावश्यक ज्ञान देतो. मुलांचं मूलाधार निरोगी आणि विश्वसनीय असू देत. त्यांना दुसऱ्या लोकांशी भेटू देत, दुसऱ्यांशी मित्रत्वाने वागू देत, प्रत्येकाशी खेळू देत आणि

आजूबाजूला यत्र तत्र सर्वत्र वावरू देत. त्यांना तसं करू द्या. तशी अनुमती द्या. अगदी लहानपणापासूनच आपल्या मुलांना सामूहिक आणि सशक्त मूलाधाराने युक्त असं बनवलं गेलं पाहिजे.

मुलांच्या संबंधात अशा कितीतरी गोष्टी आहेत, त्या जाणून घ्यायला हव्यात. त्यांच्या चैतन्य लहरींच्याबाबातीत तुम्हाला माहीत असायला हवं. त्यांच्या चैतन्य लहरींच्या बाबतीत तुम्ही जागरूक असायला पाहिजे. त्यांच्यात काय चूक आहे आणि ते काय करतात हे शोधून काढा. उदाहरणार्थ एखादा लहान मुलगा चुकीचं वागतांना तुम्हाला आढळला. तर सतत त्याच्या मागं लागू नका. त्या मुलाला एकदाच बोलवा, त्या मुलाला बसायला लावा आणि त्या मुलाशी बोला, 'तू असं करायला हवंस. जेव्हा तू आत श्रीमाताजींबरोबर असतोस, तेव्हा त्यांच्याकडे लक्ष दे.' ते तुम्हीच आहात, की जे ह्या नव्या मुलांना व्यवस्थित आकार देऊन घडवणार आहात. तुम्ही सहजयोगी आहात म्हणून विशेषेकरून ह्या मुलांना तुमच्यावर सोपवलेले आहे. तुम्हाला त्यांचं आयुष्य बरबाद करायचं नाही. तुम्हाला माहीत आहे का काही मुलं ह्या अशा प्रकारच्या गोष्टींमुळेच वेडी झाली आहेत. जसं की एक मूल आपल्या आईबरोबर इथं होतं. तुम्ही अगदी कल्पनासुद्धा करू शकणार नाही इतकी त्याची आई खूप निष्काळजी होती. मी जेव्हा तिच्या निष्काळजीपणाबद्दल आणि ती जितक्या गलिच्छपणानं आपल्या मुलाचं पालन करीत होती त्याबद्दल मी ऐकलं तेव्हा मी अगदी थक्क झाले, की ती असं कसं करू शकत होती! तुम्ही अशा प्रकारची स्त्री बनू नका, की जी आपल्या मुलाचं आरोग्य बिघडवेल. त्याचं मन नासवून टाकेल आणि असाच सगळ्यांचा नायनाट करेल. जर तुमची जागा स्वच्छ आणि साजेल अशी योग्य असेल, तर मुलांना तिथे रहायला फारच आवडेल. ते त्या जागेच्या प्रेमात पडतील.

परंतु कोणत्याही आईने आपल्या मुलाबरोबर तिच्या स्वत:च्या खोलीत बसू नये. हा अगदी कायदा आहे. दर्शन कक्ष म्हणजे ड्रॉईंग रूममध्ये तुम्ही

मुलाबरोबर बसू शकता आणि मूल झोपेत असेल तर स्वत:च्या खोलीतसुद्धा बसू शकता. नाहीतर त्या मुलाला ड्रॉइंग रूममध्ये ठेवा. तुम्हाला दिसेल. की ते मूल अधिक आनंदी होईल. कारण की सामूहिक असणं हे अत्यंत स्वाभाविक आहे. दुसऱ्यांमध्ये मिसळणं, दुसऱ्यांशी बोलणं, दुसऱ्यांची माहिती करून घेणं हे लहान मुलांच्याबाबतीत स्वाभाविक आहे. हे नैसर्गिक आहे. अबोधिता अशीच असते. अबोधितेला सगळं जग जाणून घ्यायचं असतं. त्या योग्य वेळेला तुम्ही जर त्या मुलाला असं करू दिलं नाही, तर तो विकृत होतो. त्याच्यासमोर समस्या उभ्या राहतात. त्यामुळे त्यांना अधिक चांगलं जीवन, अधिक चांगली परिस्थिती, अधिक चांगलं शिक्षण, अधिक चांगली शिस्त द्या कारण तुम्ही साधनसंपन्न आहात. तुमच्याजवळ जे होतं, ते त्यांना देऊ नका. हे खरं प्रेम आहे. अन्यथा ती स्वामित्वाची भावना असते. मला ह्यासंबंधी बोलायचंच होतं कारण मी तुमच्याशी मूलाधारासंबंधी बोलले होते आणि मी बघते आहे आणि माझ्या लक्षात येत आहे, की तुमच्या मुलांच्याबाबतीत काय घडलेले आहे. आणि तुमच्यापासून त्यांच्यात कितपत अनुशासन शिस्त येते आहे हे देखील मला आढळून येत आहे. तुम्ही स्वत: कितपत अनुशासित आहात? आणि हे करून तुम्ही त्यांच्या हातातलं खेळणं बनला आहात. त्यांना माहीत आहे, की तुम्ही त्यांच्यावर अवलंबून आहात. त्यांच्याविना तुमचं अस्तित्वच नाही. त्यांना ह्याची कल्पना आहे. म्हणून ते तुमचं म्हणणं लक्षपूर्वक ऐकत नाहीत. पण जर चांगलं वागलं नाही तर ते तुमचं प्रेम गमावून बसतील, हे त्यांना जर ठाऊक असेल, तर ते मग सरळ, ठीक ठाक होतील.

ते फार बुद्धिमान असतात. तुमची मुलं समजून घेण्याच्या उचित मार्गावर आणली गेली आहेत का, याकडे लक्ष द्या. कारण की ती वेगळी मुलं आहेत, विशेष मुलं आहेत आणि तुमच्यावरील विश्वासानं तुमच्याकडे सोपवली गेली आहेत.

लहान मुलांनी स्वाभाविकपणेच सामूहिक असायला हवे.

## प्रकरण १०

# मुलांच्या चुका सुधारून त्यांना ठीक कसे करावे?

मुलांच्या चुका दुरुस्त करून त्यांना सुधारण्याचा एक मार्ग असतो. शिक्षा द्यायला मला आवडत नाही. पण मुलांना गोष्टी सांगून, त्यांच्याशी बोलून, त्यांना यथाक्रम विभागून, तुम्ही हे चांगल्या प्रकारे कार्यान्वित करू शकता. ते साक्षात्कारी आत्मे आहेत, ती काही सर्वसामान्य मुलं नाहीत. जर तुम्ही त्यांच्याशी बोललात तर ते ताबडतोब सुजाण बनतात. जेव्हा ते बोलतात, तेव्हा ते सुज्ञतेच्या, शहाणपणाच्या गोष्टी करतात. जर तुम्ही त्यांच्याशी बोललात तर तुम्हाला वाटायला लागतं, की तुम्ही आजी-आजोबा आणि पणजी-पणजोबांच्यामध्ये बसले आहात. तुम्हाला हे समजून घेतलं पाहिजे, की ही विशेष मुलं आहेत. तेव्हा त्यांना आदरानं वागवायला पाहिजे, त्यांचं संवर्धन आदरपूर्वक करायला पाहिजे आणि त्यांच्या मनात पूर्णपणे त्यांना वाटू दिलं पाहिजे की, 'तुम्ही विशेष मुलं आहेत' आणि हे की, 'तुम्ही अशी मुलं आहात, की ज्यांना जग बदलवायचं आहे. तुम्ही या पृथ्वीतलावर फारच महान प्रयोजनासाठी आला आहात आणि त्यामुळेच तुमचं तशाप्रकारे पालनपोषण आणि संवर्धन केलं गेलं पाहिजे.' जेव्हा आपण स्वतःच अनुशासित आहोत हे त्या मुलांना समजतं तेव्हा मुलांमध्ये आपोआप स्वतःच अनुशासन कसं करावं ही गोष्ट येते.

त्यांना सांगा, 'तुम्ही साक्षात्कारी आत्मे आहात आणि तुम्ही अनादराला पात्र असू शकत नाही. त्यांच्याबरोबर थोडसं बसा. एक संभाषण, संवाद होऊ द्या. 'आपण आता एक संवाद सभा घेऊ' असं त्यांना सांगा. ज्याप्रमाणे सभागृहात असतं त्याप्रमाणे त्यांना खुर्च्यांवर बसू द्या आणि त्यांना सांगा, 'आता असं पाहा, आपण सर्व सहजयोगी आहोत आणि

तुम्हीदेखील सहजयोगी आहात. सर्व जग तुम्हाला निरखून पाहत आहे. तुम्हाला सन्माननीय मुलं व्हायला पाहिजे. तुम्हाला अशातऱ्हेचं काम करावं लागेल, तुम्हाला आपल्या वस्तू आपआपसात किंवा इतरांबरोबर वाटून घ्याव्या लागतील. नाहीतर ते म्हणतील, की तुम्ही सहजयोगी नाही. तुम्हाला प्रतिष्ठा असलीच पाहिजे.' त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्या मार्गाने विकास करा. त्यामुळे ते जाणतील, की त्यांना विभूतिमान व्हायला पाहिजे, त्यांना राजस, ऐश्वर्यशाली असायला पाहिजे. ते इतरांसारखे हलके, क्षुद्र होऊ शकत नाहीत. कारण सतत तुम्ही म्हणत राहता, 'त्याला स्पर्श करू नकोस, ते करू नकोस.' त्यांना माहीत नसतं. ते गोंधळून जातात. त्यांच्याशी बोला, की काय केलं पाहिजे, आपलं वर्तन कसं असलं पाहिजे, चांगल्या गोष्टी कशा बोलाव्यात, दुसऱ्यांना मदत कशी करावी, आपली खेळणी इतरांना कशी द्यावी, वस्तू नीटनेटक्या कशा ठेवाव्यात इ.इ. हे एक प्रशिक्षण आहे.

तुमच्या स्वतःच्या वर्तनावरूनसुद्धा मुलं शिकतात. 'नाही, नको' तुम्ही तुमच्या मुलांना न पिण्याबद्दल (मद्य) सांगता आणि जर तुम्हीच एखाद्या माशासारखे पिता, तर ती मुलं तुमचं कसं ऐकतील? जर तुम्ही ध्यान केलं नाही, तर तुम्ही अनुशासित नसता, तुम्ही अगदी अव्यस्थित, गबाळेपणाने राहता, तुम्ही कमालीचे निष्काळजी आहात, तुम्ही लोकांचा सन्मान करीत नाही, तुमची जीभ अगदी सैल सुटते आणि तुम्ही फार तीक्ष्ण आहात, तर मुलं हे सगळं चटकन् उचलतात. ते ह्या सगळ्या गोष्टी ते खूपच शीघ्रतेनं आत्मसात करतात. मुलं कसं आत्मसात करतात ते अगदी अत्यंत आश्चर्यकारक आहे.

# प्रकरण ११

# पैसा

बालपणानंतर पैशाच्या बाबतीत हास्यास्पद आवड आणि प्रेम वाढायला सुरुवात होते, पण श्रीगणेशांसाठी ते काय आहे? पैसा तर त्यांच्या चरणांची धूळ आहे. सोनं त्यांच्यासाठी काय आहे? कोणतीही गोष्ट त्यांच्यासाठी काय आहे? त्यांनी सोन्याचा मुकुट धारण केला काय किंवा मस्तकावर काहीच घातलं नाही, तरी त्यामुळे काही फरक पडत नाही. श्रीगणेश स्वत: तिथं आहेत आणि त्यांचं मस्तक अगदी तेच आहे. आदराच्या भावनेतून किंवा पूजनीयतेमुळे, पूजेत लोक त्यांना सुवर्ण किंवा कोणतीही गोष्ट अर्पण करतील. फक्त स्वत:ला समाधान वाटण्यासाठी. ठीक आहे. परंतु श्रीगणेशांना त्याचं काय? एक मूल दुसऱ्या कोणाहीकडून काहीच स्वीकारणार नाही. परंतु जर कधी त्यानं ती वस्तु घेतली, तर तो विचार करेल, 'ठीक आहे, पण मी आता हे परत कसं करायचं?' तुम्ही अगदी लहानशी वस्तु जरी त्यांना दिली ते त्या वस्तूला अगदी सुरक्षित ठेवतील आणि तुम्ही ती वस्तू दिली आहे, याचं नेहमी स्मरण ठेवतील.

## प्रकरण १२

# भाषा प्रसन्न असावयास पाहिजे

तुम्ही असं म्हणू शकत नाही, 'मला हे आवडतं' किंवा 'ह्याच्यासारखा देव मला आवडतो...' एखाद्या व्यक्तीच्या आवडीला अनुसरून हे केलं जात असतं का? अशाच प्रकारामुळं एखादी व्यक्ती केवळ स्वत:च्या मर्जीप्रमाणं वागणारी आणि मनमानी करणारी होऊन सामूहिकतेमधून बाद होते. हेच ते, की जे मुलांना शिकवायचं असतं. 'मी तिरस्कार करतो, मला तिटकारा वाटतो' हा एक दुसरा असा शब्द आहे, की जो बोलला जाऊ देऊ नये. तो अत्यंत चुकीचा शब्द आहे. मुलांनी कधीही असला वाईट शब्द शिकू नये. आपण अगदी चांगली भाषा वापरली पाहिजे आणि आपल्याला रागदेखील यायला नको. आपली भाषा प्रसन्न, मृदु असायला पाहिजे. ते फारच महत्त्वाचं आहे. संत जसे मृदु, प्रसन्न भाषेत बोलतात, त्यासारखं तुम्ही बोलायला पाहिजे. रागारागानं बोलायला नको. लोकांचा अपमान करण्याच्या सुरात किंवा कोणत्याही प्रकारे त्यांना कमी लेखण्याच्या प्रकाराने नको. अगदी तुमची मुलं जरी असली, तरी त्यांच्याशी तुम्ही गौरवानं बोललं पाहिजे. जसं पाहा, की आपल्याला सुद्धा मुलांना दाटून, रागवून बोलण्याची वेळ येते. तेव्हा देखील आपण त्यांना मान, प्रतिष्ठा देतो. जसं की तुम्ही इंग्रजीत 'तू thou' म्हणता. 'आता तुला जागेवर बसावं लागेल.' की लगेच मुलाला भीती वाटायला लागते. 'मी काय केलं आहे?' You म्हणजे 'तुम्ही' या शब्दाचा उपयोग करण्याऐवजी आपण 'तू (thou)' ह्या शब्दाचा का उपयोग करतो? जसं तुम्ही बघा, 'अहो महाशय, आपण, आपणच इकडे या.' त्यामुळे 'महाशय' घाबरून जातात, त्यांना भीती वाटते. आणि म्हणतात, 'का? मी काय केलं आहे?' आपण आपल्या नोकरांना तशाच

प्रकारे बिघडवतो, तेव्हा त्यांनादेखील भीती वाटते. ‘का? का म्हणून आज असं म्हटलं गेलं आहे?’ परंतु शिव्यांचा प्रयोग करू नये. कोणत्याही वाईट गोष्टीचा उपयोग करू नये आणि मुलांना मार देखील देऊ नये. जर ती कमालीची विचित्र असतील किंवा अत्यंत उद्धट असतील तर मग ठीक आहे. हे ठीक आहे, पण ते फारच क्वचित् घडतं कारण त्यांच्यापैकी जास्तीत जास्त साक्षात्कारी आत्मे आहेत. आणि ते तुम्हाला ताप देणार नाहीत. ते फिरून परत तुमच्याकडेच येतील. त्यांनी ‘मी आपली क्षमा मागतो’ किंवा ‘मला जरा माफ करा’ असं म्हणायला शिकायला पाहिजे.

## प्रकरण १३

# दिवा दुसऱ्यांसाठी जळतो, स्वत:साठी नव्हे

लोकांना आपल्या मुलांबद्दल फार जास्त आसक्ती वाटते. ते फक्त आपल्या मुलांबद्दलच विचार करतात, इतर कशाबद्दल नाही. हा आणखी एक प्रकारचा स्वार्थ आहे. जर तुम्ही केवळ स्वत:च्याच मुलांचा विचार केलात आणि दुसऱ्या कोणाचाच नाही, तर तीच मुलं सैतान होतील आणि तुम्हाला चांगला धडा शिकवतील! मग नंतरच्या वेळी तुम्ही म्हणाल, 'अरे भगवंता, मला आणखी मूल देऊ नकोस. अगदी पुरेशी झाली आहेत मला (मुलं)!' परंतु जर तुम्ही आपल्या मुलाला सामूहिक बनवलंत आणि आपली वस्तू दुसऱ्याला देणं आणि त्या देण्याचा आनंद लुटणं शिकवलंत, तर अगदी लहानपणापासून तो उदार बनतो. 'ऐश्वर्य' याचा अर्थ केवळ पैसा, धनच नव्हे, औदार्य पैशापेक्षा वरचढ आहे आणि तेच 'ऐश्वर्य' होय आणि अवतारी व्यक्ती आणि सहजयोग्यांचं हेच लक्षण आहे.

मुलं जेव्हा मोठी होतात, तेव्हा त्यांचे पालक, आई-वडील त्यांना पैसे देत नाहीत आणि त्यांची काळजीदेखील घेत नाहीत. पण त्यांच्याविषयी (मुलांविषयी) त्यांच्या मनात स्वामित्वाची भावना नक्कीच असते. हे समजून घेणं महत्त्वाचं आहे, की सर्वप्रथम स्वत:च्या मुलांची काळजी घ्या, त्यांना पोषणासाठी जे काही आवश्यक आहे, ते त्यांना द्या, त्यांना मार्गदर्शन करा आणि त्यांना लाडावून बिघडवू नका. आणि दुसरं म्हणजे एकदा का त्या तुमच्या मुलांचा विवाह झाला आणि त्यांना त्यांची मुलं झाली, तेव्हा तुमच्या मुलांवर आणि त्यांच्या मुला-बायकांवर अधिकार गाजवू नका.

त्यानंतर तिसरं म्हणजे महालक्ष्मीचा अवतार ख्रिस्ताची माता म्हणून

झाला. तिनं आपल्या मुलाला सुळावर चढवण्यासाठी देऊन टाकलं. तर आपण आपलं थोडं अंतर्निरीक्षण करू या का? एखाद्या ससाण्याप्रमाणे आपण आपल्या मुलांशी घट्ट चिकटून आहोत? जर मुलांना कोणी काही म्हटलं, तर लोकांना ते आवडत नाही. आपण आपल्या मुलांशी एवढे आसक्त आहोत, तर मग आपण त्यांना काय शिकवत आहोत? आपण त्यांना काही त्याग वगैरे शिकवत आहोत काय? आपल्या वस्तूत इतरांना सहभागी होणं, असं काही आम्ही त्यांना शिकवत आहोत काय? आम्ही त्यांना सहिष्णुता शिकवत आहोत काय? आम्ही त्यांना क्षमाशीलता शिकवत आहोत काय? सुळावर चढणे तर सोडूनच द्या, अगदी छोटीशी शिक्षासुद्धा सोडून द्या. आता तर लहान मुलगा म्हणजे सहजयोग्यांसाठी फार मोठं दिव्य झालं आहे. प्रत्येकालाच मुलं होतात. त्यात एवढं मोठं काय आहे? तुम्ही कशा प्रकारची मुलं आहात ह्यातच थोरपणा आहे.

आपण आपल्या मुलांना मोठं होऊ देतो काय? ती मुलं मत्सरी आहेत काय? ती मुलं संत आहेत काय? ती मुलं सुंदर आहेत काय? ती सर्व दुसऱ्यांशी कसं बोलतात? त्यांच्यात आत्मविश्वास आहे का? उद्या ते पुढारी, नेता बनतील. जसे, की शिवाजीमहाराज आणि त्यांची आई, जिजामाता. तिनं आपल्या मुलाला कसं थोर बनवलं! ती आईच आहे, की मुलाला महान बनवते. जर तिला असं वाटलं, की मुलांनी तिलाच पकडून ठेवावं आणि तिनंही मुलाला पकडून ठेवावं, तर झालंच मग! कारण हे आत्मघातकी आहे.

आमच्या मुलांची वाढ आणि विकास त्यांच्या थोर होण्यात परिणत होतो की नाही हे पाहणं आमचं कर्तव्य आहे. आमच्यापेक्षा अधिक मोठे! त्यांना साऱ्या जगाची काळजी घ्यायची आहे. अवघ्या विश्वाची चिंता करायची आहे. जर तुम्ही तुमच्या मुलांबरोबर काही वेळ घालवला तर हे आवर्जून बघा, की तुम्ही त्यांना योग्य साच्यात घालून साकार करीत आहात,

प्रेमाने त्यांना पुष्ट करीत आहात, आरोग्यसंपन्न करीत आहात आणि त्यांना सांगत आहात, की त्यांनी आपलं प्रेम दुसऱ्यांना द्यावं आणि हे, की त्यांनी अशा रीतीनं वागावं की त्यांच्यातला तो प्रकाश प्रत्येकाला जाणवेल. नाहीतर ते सैतान होतील. जसा, की रावण! रावण एक साक्षात्कारी आत्मा होता, पण त्याच्या आईने त्याला बिघडवलं आणि तो सैतान, राक्षसी वृत्तीचा झाला. जर तुम्हाला तुमची मुलं सैतान व्हायला नको असतील, तर सर्वप्रथम हे लक्षात घ्या, की ती तुमची मुलं नाहीत, ती माझी मुलं आहेत आणि तुमच्या विश्वासावर ती मुलं ठेव म्हणून तुमच्याकडे सोपवलेली आहेत आणि तुम्ही तुमच्या मुलांना बुटके, ठेंगू आणि लहान बनवायचं नाही आहे. आम्हाला आमच्या मुलांना दिव्यांसारखं बनवायचं आहे. दिवा दुसऱ्यांसाठी जळतो, स्वत:साठी नव्हे. जर तुम्ही एखादा हिरा घेतला आणि त्याला गटारात टाकलं, तर तुम्ही त्याला गमावून बसाल. अगदी तसंच आहे हे. तुम्हाला अगदी सर्वोत्तम मुलं जरी असली तरी 'हे माझं मूल आहे, तो माझा आहे' अशा प्रकारच्या मूर्खपणाच्या कल्पनेमुळं तुम्ही त्यांचा सर्वनाश घडवून आणू शकाल. तुमच्या मुलांना चांगल्या गोष्टींचं दर्शन घडू द्या. चांगलं म्हणजे काय ते त्यांना सांगा. दुसऱ्यांशी चांगलं कसं असावं हे त्यांना सांगा. दुसऱ्यांची काळजी कशी घ्यावी. हे त्यांना सांगा. त्यांना दुसऱ्यांचे पाय कसे चेपावेत हे सांगा. त्यांचे केस कसे विंचरावेत, दुसऱ्यांना अन्न कसं द्यावं हे त्यांना सांगा.

त्यांना शिकवा. छोटी-छोटी भांडी त्यांना हातात घेऊ द्या आणि दुसऱ्यांना खायला देऊ द्या. पक्ष्यांना भरवू द्या, झाडांना, फुलांना पाणी देऊ द्या. त्यांना लहान, क्षुद्र बनवू नका. त्यांच्यापैकी काही मुलं खरंच चपळ, क्रियाशील आहेत, मोठे संत आहेत.

सहजयोगात तुम्ही आशीर्वाद प्राप्त झालेले लोक आहात. तुम्हाला कोणत्याही गोष्टींचा त्याग करायचा नाही. परंतु तुम्ही आपल्या मुलांचं संवर्धन जर योग्य प्रकारानं केलं नाही, तर पुढे जाऊन ते तुम्हालाच

त्याबाबतीत जबाबदार धरतील. ते तुम्हालाच विचारतील, 'आमचा विकास होण्यासाठी पूर्ण अवसर, अवकाश का बरं दिला नाहीत?' जर तुम्हाला आढळून आलं की तुमचं बाळ हट्टी आहे, जर तुम्हाला तुमचं लेकरू कंजूष आहे असं दिसलं, जर दुसऱ्यांबरोबर प्रेमात सहभागी कसं व्हावं हे त्याला कळत नसलं, जर तो दुसऱ्यांवर वर्चस्व गाजवणारा असेल तर ताबडतोब ह्या सगळ्या गोष्टींना आवरा, आळा घाला. मुलं फार हुशार असतात, भलतीच चतुर आणि बुद्धिमान! ज्या क्षणी त्यांना कळतं, की ते तुमचं प्रेम गमावून बसतील, त्या क्षणापासून ते चांगलं वर्तन करायला लागतील.

# प्रकरण १४

# सहजसंपर्क वाढवा

प्रत्येक मुलाबरोबर सहजसंपर्क स्थापित करा आणि तो वाढवा. हा सहजसंपर्क आनंददायक असायला पाहिजे. शिक्षक आणि लहान मुलांच्या राहण्याच्या खोल्यांवर लक्ष देणारे आणि त्या मुलांचा सांभाळ करणारे कर्मचारी त्या मुलांपासून दूर, वेगळे असायला नकोत. परंतु एखाद्या कुटुंबासारखे एकमेकांमध्ये मिळून मिसळून राहणारे असावेत. शिक्षकांनी पालकांची म्हणजे आई-वडिलांची भूमिका पार पाडायची असते आणि मुलांपासून अलिप्त आणि विरक्त, त्यांच्याशी थंडपणानं वागणारे असायचं नसतं. वरच्या वर्गातली मोठी मुलं आणि खालच्या वर्गातली लहान मुलं ह्यांच्यामध्ये सहजसंवाद असायला पाहिजे. तसाच, की जसा मोठा भाऊ आणि लहान भाऊ ह्या दोघांमध्ये असतो. ते एकत्र खेळू शकतात. कनिष्ठ मुलं ज्येष्ठ मुलांना प्रश्न विचारू शकतात आणि ज्येष्ठ मुलांनी त्या प्रश्नांची उत्तरं दिली पाहिजेत.

निसर्गाशीसुद्धा सहजसंपर्क वाढवा. पर्वत, नद्या, जंगलांकडे पाहत असतांना मुलांनी निसर्गात 'सहज' काय आहे ह्याचं निरीक्षण केलं पाहिजे. मुलांनी असं प्रकाशरंजित चित्र आणि त्यातून अशी अवस्था प्राप्त केली पाहिजे, की हे संपूर्ण विश्व 'सहज' आहे. त्यांना जे काही शक्य असेल त्याचा संबंध त्यांनी सहजाशी जोडायला पाहिजे. तुम्ही त्यांचे फार जास्त लाड आणि प्रेम करायला नको किंवा त्यांच्याबाबतीत वाजवीपेक्षा जास्त कडकदेखील व्हायला नको. दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. त्यांना एक गोष्ट माहीत असायलाच पाहिजे, की तुम्ही त्यांच्यावर सहजयोगी म्हणून प्रेम करता आणि त्यांचा मान ठेवता कारण ते सहजयोगी आहेत. त्यांच्या मनात

ही धारणा पक्की बिंबवा, ‘तुम्ही सहजयोगी आहात आणि त्यामुळेच आम्ही सर्वजण तुमचा आदर करतो.’ ते रडूओरडू शकत नाहीत, चुकीच्या क्षणी चुकीच्या मुद्दयावर गैरवर्तन करू शकत नाहीत कारण की, ते सहजयोगी आहेत. आपण त्यांच्याशी बोलायलाच पाहिजे. तुम्ही त्यांची जबाबदारी प्रस्थापित करायलाच हवी की, ‘तुम्हाला महान कार्य करायचं आहे. तुम्ही लोकांना आत्मसाक्षात्कार द्यायचा आहे. तुम्ही जेव्हा मोठे व्हाल तेव्हा तुम्हाला हे करावं लागेल, ते करावं लागेल. तुम्हाला दूरदूरच्या देशांमध्ये जायला लागेल. तुम्हाला हे जाणून घ्यावं लागेल, ते माहीत करून घ्यावं लागेल.’ एकदा का मुलांना तुम्ही हे सगळं सांगितलंत की मग ते सहजयोगी म्हणून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करायला सुरुवात करतील. कारण त्यांचा जन्मच तशा प्रकारानं झाला आहे. परंतु जर तुम्ही त्यांना योग्य मार्गाच्या प्रणालीत प्रवाहित केले नाहीत, तर वातावरणामुळे, ते दुसऱ्याच दिशेला जातील आणि भरकटतील. सहजयोगाच्या तत्त्वांना अनुसरून आपल्या मुलांचा विकास करण्याचा आणि ती तत्त्वं त्यांच्यात पूर्णपणे मुरवू देण्याची एक फार मोठी संधी आपल्याला मिळालेली आहे.

मुलांचं मन रमवायला पाहिजे आणि त्यांना कंटाळवाणं वाटू द्यायला नको. त्यांना छोटी छोटी घरं बनवू द्या, बाग निर्माण करू द्या आणि अशी छोटी छोटी कामं करायला लावा, की त्यांचं अवधान, लक्ष बरोबर त्याच्यातच राहील. त्यांना गोष्टी सांगा, विनोदी चुटके, गाणी सांगा. त्यांना चित्र रेखाटायला मदत करा. त्यांना तुमचा सहवास असण्याची जाणीव व्हायला पाहिजे. त्यांचं बोलणंदेखील तुम्ही लक्षपूर्वक ऐका, फारच रंजक असतं ते!

## प्रकरण १५

# आपल्या मुलांप्रमाणे सर्व मुलांवर प्रेम करा

तुम्ही तुमच्या स्वतःच्या मुलांवर जसं प्रेम करता, तसंच सर्व मुलांवर करा. ते अधिक चांगल्यातऱ्हेनं कार्यान्वित होईल. जर कोणत्याही मुलातील दोष सुधारले जात असतील तर कोणीही आक्षेप घेऊ नये. जर तुमच्या मुलाची चूक सुधारून कोणी त्याला ठीक केलं तर ज्यांनी तुमच्या मुलामध्ये चूक दूर करून सुधारणा केली त्यांचे तुम्ही आभारी असायला पाहिजे. तेव्हा कुठे मुलांना सामूहिकतेची, त्यातल्या लोकांची भीती वाटते. कारण ते असा विचार करतात, की त्यांनी जेव्हा गैरवर्तन केलं तेव्हा सगळी सामूहिकता एकत्रित होती. जर तुम्ही फक्त तुमच्या स्वतःच्या मुलाला आधार किंवा पाठिंबा द्यायला सुरुवात केलीत तर मग तुमचा मुलगा भलताच चलाख होईल. त्याला माहीत असतं, की कोणीही मला काहीही म्हणू शकत नाही. जर तो मुलगा बिघडला किंवा वाईट वागायला लागला तर सामूहिकतेतल्या सर्व व्यक्तींना त्याची जाणीव झालेली असते. पण जर कोणी त्याला पाठिंबा दिला तर तो मुलगा उद्धट होईल.

आपण सर्वांनी सर्वच मुलांना आधार दिला पाहिजे आणि जर एखादा मुलगा चुकला तर मग आम्ही सगळ्यांनी म्हटलं पाहिजे, 'असू देत, तू चुकला आहेत.' ती सगळी तुमचीच मुलं आहेत, अशाप्रकारे त्या गोष्टीकडे पाहा, ती सामूहिक मुलं आहेत. तुम्ही त्यांची काळजी घ्यायची आहे. त्यांच्याबद्दल तुम्ही चिंता करायची आहे. तुम्ही त्यांना मदत करायची आहे. सामूहिकतेच्या मूलभूत आधारावर प्रत्येक गोष्ट केली गेली पाहिजे. समजा एखादा मुलगा वाईट असला, तर आपण सगळ्यांनी त्याला सांगितलं पाहिजे की, 'तू वाईट आहेस.' नंतर त्याच्यात सुधारणा होते आणि हेदेखील आपण त्यांना सांगायला हवे, 'तुम्ही सहजयोगी आहात. तुम्ही असं काही करू शकत नाही. तुम्ही सहजयोगी आहात, तुम्ही थोर आहात. तुम्ही ह्यासारखं काही करू शकत नाही.' आणि हेदेखील अगदी चांगल्या तऱ्हेनं कार्यान्वित होईल.

## प्रकरण १६

## खेळ

श्रीमाताजी लहान मुलांचं संरक्षण करत असतात. त्यामुळं त्यांनी आक्रमक खेळांच्याबाबतीत चिंता करू नये.

खेळ नेहमी आनंदासाठी आणि मनोरंजनासाठी, करमणुकीसाठी असतात.

अंत्याक्षरी खेळ चांगले आहेत. ते खेळ मुलं आपापसात खेळतात आणि स्वत:चा खेळ निर्माण करतात.

## प्रकरण १७

# विश्वविद्यालयीन शिक्षण

सध्या विश्वविद्यालये जशी काही आहेत, त्यावरून ती अशी स्थानं आहेत, की जिथं सर्व विध्वंस असतो. तरी मला खात्री आहे, की ज्या मुलांचं परिपालन सहज विद्यालयांमध्ये झालेलं आहे, ती मुलं कुठंही गेली तरी बदलू शकत नाहीत. ते दुसऱ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणतील, पण ते स्वतः बदलणार नाहीत. कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास इतक्या चांगल्या प्रकारानं झाला असेल, की तेच दुसऱ्यांवर छाप पाडतील. सहजयोगी स्वतः बदलत नाहीत. ते दुसऱ्यांना बदलवतात.

उच्च विद्यालये आणि महाविद्यालयात संगणक (कॉम्प्युटर) शिकवले जाऊ शकतात. पण तुम्ही स्वतःच एक सर्वोत्तम संगणक आहात.

## प्रकरण १८

# विद्यार्थ्यांच्या वर्गात

शिक्षकांनी ते शिकवत असलेला विषय रोचक बनवला पाहिजे. मुलांची त्या विषयातली रुची जागृत होण्यासाठी नवीन नवीन मार्ग शोधून काढावेत. शिकवत असतांना ते शिकवणं फारच गंभीर नसावं. एखाद्या खेळासारखं देखील ते असू शकतं.

गणितातल्या मूलभूत प्रक्रियांसाठी उपयोगात आणलं जाणणारं गणक-यंत्र (कॅलक्यूलेटर) जरी उपलब्ध असलं तरीदेखील पाढे पाठ करणं अत्यावश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यानं आपली एक दैनंदिनी ठेवावी. त्यात विद्यार्थी गोष्टी, अनुभव, निरीक्षण लिहू शकतात.

मुलाचं लक्ष किंवा अवधानात सुधारणा होण्यासाठी संपूर्ण प्रयत्न केला गेला पाहिजे.

आता मुलांच्या बाबतीत मुख्य गोष्ट म्हणजे ते जिथं आहे त्या जागी त्यांना पूर्णपणे सुरक्षित वाटायला पाहिजे. मुलांसाठी सुरक्षितता ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. एखाद्या जागी त्यांना सुरक्षित वाटत नसेल, तर आपण त्यांना बऱ्यापैकी संतुलनात आणू शकणार नाही.

मॉन्टेसरीच्या सगळ्या साधनसामग्रीमुळे त्यांचा ओढा खेळण्यांकडे अधिकच असतो आणि त्यातली काही खेळणी तर फारच खर्चिक आणि महाग असतात. काही शैक्षणिक क्रीडासाधनं किंवा खेळणी विकत घ्या. परंतु खूप जास्त नाही. (आणि लहानशा बेंचच्या मधून मारले जाणारे ठोकळे नकोत)

वर्गखोली शुष्क, नीरस असू देऊ नका. त्यात काही फुलं, लहान लहान रोपटी, पानं जशी बागेत असतात, तशी असू द्या. शिक्षकाचा पोशाख परिचारकासारखा (नर्स) नसावा. मुलांच्या समोर जरा हसा. आम्ही आनंदी आहोत हे त्यांना दाखवा. त्यांचं कौतुक करा. पाच ते सहा वर्ष वयापर्यंतच्या प्रत्येक मुलाचा चांगला मसाज रोज रात्री केला गेलाच पाहिजे. रात्रीच्या वेळी त्यांच्या शरीराला तेलानं मालिश करावं. प्रत्येक गोष्टीसाठी ऑलिव्ह तेलाचा उपयोग केला जाऊ शकतो आणि नंतर चांगल्या टॉवेलनं त्याचं शरीर व्यवस्थित पुसून काढा. (जर आवश्यक असेल तर शरीराच्या काही भागावर थोड्या पावडरचा उपयोग करा. परंतु त्यावेळी त्यांचा चेहरा झाकून ठेवा कारण पावडर त्यांच्या नाकापर्यंत, नाकात जाऊ शकेल.) सकाळी आंघोळीपूर्वी त्यांच्या डोक्याला मालिश करा आणि थोडं तेल नाकात आणि कानातदेखील घाला.

नाटक, नृत्य, शास्त्रीय नृत्य, संगीत, कला आणि हस्तकला शिकवावी. त्यांना जे जाणून घ्यायची आवश्यकता नाही ते त्यांना शिकवू नका. जोपर्यंत त्यांना गाडी चालवणं येत नाही, त्यांना रस्त्यांची नावं माहीत करून घेण्याची आवश्यकता नाही.

निरर्थक, मूढ कृती किंवा पद्धतींच्या आहारी जाऊ नका. जसं सुरी आणि काटा एकत्र एका विशिष्ट पद्धतीनंच मुलांना ठेवायला लावणं! पेन्सिल योग्य पद्धतीने कशी पकडायची, धरायची हे शिकणं मुलांसाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. पण अक्षरं आणि अंक लिहिण्यासाठी त्यांना जबरदस्ती करू नका. त्यांना अंक आणि वर्णाक्षर तेव्हाच शिकवा जेव्हा मुलं त्यासाठी शारीरिक दृष्ट्या तयार असतील, पण फारच लहानपणी नको.

आता ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांबद्दल, त्यांना सोनं, चांदी इ.धातु आणि संगमरवर आणि त्याचे प्रकार, गोमेद रत्न ह्यांचा अनुभव (स्पर्शाचा) घेऊ

द्यात. त्या सगळ्या द्रव्यांची आणि त्यामुळं येणाऱ्या संवेदनांची अनुभूती घेऊ द्या. मातीपासून बनवलेली भांडीकुंडी देखील. संयोगापासून बनवलेली कृत्रिम धाग्यांची वस्त्र टाळावीत.

त्यांना चार-पाच वेगवेगळ्या पद्धतीनं कापडावर चितारलेल्या रंगीबेरंगी आकृतींना मनापासून दाद देऊ द्यात. वेगवेगळी डिझाईन्स! त्यातली कोणती त्यांना आवडतात आणि कोणती आवडत नाहीत हे पाहा.

त्यांना ताऱ्यांबद्दल सांगा. तारे म्हणजे काय? ग्रह म्हणजे कोणते...? मृत गोष्टींपेक्षा त्यांना जिवंत गोष्टींबद्दल सांगा.

झाडं काय आहेत आणि लाकडाचा उपयोग काय इ.माहिती त्यांना द्या. झाडं म्हणजे जिवंत व्यक्ती आहेत अशी वागणूक त्यांना द्या. त्यांची निगा राखा. त्यांना नावंदेखील द्या.

प्रत्येक सजीव गोष्टींची काळजी घेतलीच पाहिजे. (जेव्हा लहान मुलं गालिच्यावर काही सांडतात तेव्हा प्रत्येक जण भयभीत होऊन तिथं धावतो. त्या मुलाला सांगा की ठीक आहे, घाबरू नकोस. नाहीतर त्या मुलाचा आत्मविश्वास तुम्ही खंडित कराल. जेव्हा मुलं झोपतील तेव्हा तुम्ही तो गालिचा स्वच्छ करा.)

बाहेर सहलीला जाणं इत्यादी गोष्टी फार छान असतात. वस्तुसंग्रहालय किंवा प्राणिसंग्रहालय! त्यांना मोठमोठी उद्यानं आणि बागा दाखवा. परंतु युद्धाची साधनं दाखवू नका. त्यांनी शस्त्रांशी, हत्यारांशी खेळ करायचाच नाही. त्यांना बाहेर जाऊ द्या आणि त्यांना ज्या ठिकाणी भेट द्यायची आहे, तिथल्या भेटीसाठी त्यांची पूर्वतयारी करा. तिथं गेल्यावर त्यांनी कोणत्या गोष्टींची अपेक्षा करायची आहे, हे त्यांना सांगा. त्यासंबंधी त्यांना सांगा. जेव्हा ते बाहेर असतात त्यावेळी आदर कसा प्रकट करावा. अभ्यागतांचा

आदर कसा करावा, हे सांगावं. शुभ प्रभात (गुड मॉर्निंग), शुभ संध्या (गुड इव्हिनिंग) आणि शुभ रात्री (गुड नाईट) कसं म्हणावं हेही त्यांना शिकवावं.

त्यांना एकमेकांबरोबर गोलाकार बसू द्या आणि देवी-देवता आणि श्रीमाताजींबद्दल बोलू द्या.

सहजयोगाच्या बाबतीत संवाद, संपर्क करण्यासाठी शाळा एक वाहन, साधन आहे. सर्वप्रथम त्यांनी सहजयोगी असायला हवे.

असलं काही मुळीच नको...'मला आवडतं...' मुलांनी आपापसात सहभागी होणं, देणं ह्या गोष्टींचा आनंद लुटला पाहिजे. देण्याचा आनंद घेतला पाहिजे. आपण असंच म्हणायला पाहिजे, 'देवाला आवडत नाही...' हे नाही की, 'मला आवडत नाही!'

पूर्णत्वाचा आपण एक भाग आणि महत्त्वाचा अंश आहोत, आपण सगळे एक आहोत असा विचार करण्याच्या बाबतीत आणि प्रत्यक्ष आचरणाच्या बाबतीत त्यांना प्रोत्साहन द्या. त्यामुळे त्यांना सामूहिक एकत्वाचा आनंद घेऊ द्या. सहजयोगाचा अभ्यास आणि सराव करण्यास त्यांना शिकवा.

मुलांना सांगितलं गेलंच पाहिजे, की ते सहजयोगी आहेत आणि त्यांना त्याबाबत गौरव आणि प्रतिष्ठा असलीच पाहिजे. म्हणावं, 'परमेश्वराने तुला एका महान कार्यासाठी निवडलं आहे. तू एक सहजयोगी आहेस.' मग त्यांना जबाबदारीची जाणीव होते, की त्यांना अधिक चांगल्याप्रकारे वागायला लागते.

सदैव त्यांना सांगत राहा, की ते एका विशेष प्रकारचे लोक आहेत. 'तर मग तुम्ही अशा प्रकारे वागू कसं शकता, त्यासारखं बोलू कसं शकता?'

जेव्हा एखादा लहान मुलगा किंवा मुलगी प्रत्येक गोष्ट स्वत:साठीच

करण्याचा प्रयत्न करतो/करते. तर ते तोपर्यंतच ठीक आहे जोपर्यंत ते तेवढ्याच तत्परतेने दुसऱ्यांसाठीसुद्धा करायला तयार आहेत. मग ती आपल्या न्याहारीतली वस्तु (दूध/खीर इ.) स्वत:साठी ओतून घेते, आता ती आम्हालादेखील कोणता तरी पदार्थ खायला देते. अशाप्रकारे लहान मुलांचं अवधान त्यांच्या स्वत:वरून दुसरीकडे वळवलं जातं. ह्याबाबतीत नेहमी अंतर्गत बदल करणं, आपआपसात देवाणघेवाण करून बदल करणं, हे फार महत्त्वाचं आहे. आपल्या खाण्यात दुसऱ्यांना हिस्सा देणं, दुसऱ्यांची आंथरूणं घालून देणं इ.इ.

प्रत्येकानं लहान मुलांशी बोलायलाच पाहिजे. प्रत्येकानं लहान मुलांमध्ये रुची घेतली पाहिजे. त्यांना लहान लहान भेटवस्तू द्या.

लहान मुलांचं फार जास्त वेळा चुंबन घेऊ नये. (जंतुसंसर्गामुळे) चेहऱ्यावर तर नकोच. त्यांच्या कपाळावर, मस्तकाच्या वरच्या भागावर किंवा बाजूला ठीक आहे.

ज्या व्यक्तीचं संगोपन चांगल्या संस्कारांनी केलं गेलं आहे ती व्यक्ती दुसऱ्यांचा आदर करते. ज्या व्यक्तीचा आदर केला जातो तिचंदेखील हेच लक्षण आहे.

मुलांना धूर्तपणानं आणि चलाखीनं काम करणारी अशी बनवू नका. त्यांना अधिक नम्र, लवचिक, गोड आणि प्रेमळ बनवा.

त्यांच्यात जागरूकता, तत्परता आणि सावधपणा आलाच पाहिजे. आत्मसंतुष्ट असणं कोणालाही अगदी आतून सुस्त, मंद बनवतं.

त्यांनी स्पर्धा करू नये. जर त्यांना कोणत्याही बाबतीत स्पर्धा करायची असेल, तर ती चांगुलपणा, गोडवा आणि काळजी घेण्याबाबतीत असू द्या. तेव्हाच तर ते अधिक संतुलित आणि प्रतिष्ठित बनतील. ह्यासाठी त्यांना जरा

बक्षिसं द्या! ‘आता सांगा, तुम्ही रस्त्यावरून कसं चालाल? श्रीमाताजींसमोर तुम्ही झुकून प्रणाम कसा करणार?’ ते आम्हाला सांगतील, एवढंच नाही तर चक्रांबद्दल देखील सांगतील.

साधारणपणे आपण जेव्हा कोणाला भेटतो तेव्हा म्हणतो, ‘तू फार छान दिसतो आहेस’ किंवा ‘आज तर तू भलताच खुश दिसतो आहेस!’ पण ही केवळ बाहेरून दिसणारी बाब आहे. अंतरंगाशी जोडणारे प्रश्न विचारा, ‘तू ठीक तर आहेस ना?’ किंवा दुसऱ्या एखाद्या देशातून आलेल्या व्यक्तीचा वेश पाहून किंवा आणखी असलं काही तरी पाहून ‘हा पोशाख मस्त आहे’ असं मुलं म्हणू शकतात. आता सौंदर्याचा भाग, सुंदर कसं दिसावं, केवळ नीटनेटकं नव्हे. अवतीभवतीचं वातावरण विकृत किंवा अस्वस्थ करणारं नको. ते सुशोभित हवं. पाश्चिमात्य देशातलं सौंदर्य कृत्रिम असतं. ते अगदी नैसर्गिक आणि स्वाभाविक पाहिजे. अधिक नैसर्गिक गोष्टींचा स्वीकार करा. उदाहरणार्थ, भारतामध्ये चिकणमातीचा उपयोग करून अंग स्वच्छ केलं जातं. गवतावर पायताण न घालता चालणं चांगलं असतं. ते चांगली दृष्टी असण्यासाठी आणि पावलावर असलेला जो बाक आहे, त्यासाठी चांगलं असतं.

केस - रात्री त्यांना थोडंसं तेल लावावं. साबणापेक्षा चणाडाळीचं पीठ केव्हांही अधिक चांगलं. त्या मुलांचे चेहरे दुधात ब्रेड घालून धुवावेत. त्यामुळे त्वचा चांगल्याप्रकारे साफ होते.

त्यांना लष्करातल्यासारखे पोशाख नकोत. कपड्यांमुळं त्यांना कसं जास्त प्रतिष्ठित, भारदस्त वाटायला पाहिजे. कपडे रंगीत हवेत, फक्त राखाडी रंगाचे नकोत. फुलांचं डिझाईन असलेले कपडे छान दिसतात. मुलांना कैद्यांसारखे चौकडीचे कपडे घालू नये. कपड्यांच्या बाबतीत त्यांच्या मनात अधिक आवड निर्माण होईल असं काहीतरी करा. त्यामुळे पोशाखाच्या

बाबतीतली उचित मूल्यं त्यांना कळायला लागतील. सैन्यातल्या सैनिकांसारखं (तोच तो पणा) नको. अगदी भरपूर विविधता पाहिजे. मुलांनी काळे आणि धुळीच्या किंवा मातकट रंगांचे कपडे घालायला नकोत. (ते असं दिसं की जणु काही त्या रंगांमध्ये चिखल मिसळला आहे.)

नखांसाठी तैलरंगांचा उपयोग करू नका. त्यांच्या नखांना रंगवण्यासाठी मेंदीचा उपयोग करा. हे एक नैसर्गिक उत्पादन आहे. मुलींनी बांगड्या घालायला पाहिजेत. त्यामुळे स्वाभाविकपणेच स्त्रियांसारखं दिसायला मदत होते. जर एखादी मुलगी मुलासारखं किंवा पुरुषासारखं होण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांना जरा विनीत होऊ द्या, जरा खाली आणा, इथपर्यंत की त्या जशा असायला हव्यात. जीन्स मुळीच नकोत.

आरती मुलांसमवेत करा. त्यांची लयीची जाण निर्माण करण्यासाठी आणि कसं गावं हे कळण्यासाठी आरतीबरोबर भरपूर वाद्यं आणि संगीत असू द्या. सुरात गाणं महत्वाचं आहे.

स्वप्नाळू, तरल-धूसर पऱ्यांचं जग नको. त्यांना हवेत इकडे-तिकडे तरंगू देऊ नका. त्यांना वास्तवाचं भान द्या. ते कवी होऊ शकतील पण त्यांच्या कवितेतल्या प्रतिमा ब्लेकच्या कवितेत असतात तशा खऱ्या, अस्सल असू द्या.

दुसऱ्यांचं कौतुक आणि गुणग्रहण करण्यासाठी दुसऱ्या देशांमधल्या लोकांची वेशभूषा पाहा. वेगवेगळ्या राष्ट्रांचे पोशाख परिधान केलेल्या बाहुल्यांचा संग्रह करणं किती छान आहे!

खऱ्या अर्थानं आंतरराष्ट्रीय शाळा आहे हे दिसण्यासाठी मुलांना वेगवेगळी वेशभूषा घालून असू द्या! त्यांच्या भाषेत 'धन्यवाद' अर्थात् 'थँक्यू' कसं म्हणायचं हे त्यांना शिकवा. अशाप्रकारे मुलांची मनोवृत्ती

विकसित आणि विशाल होते.

मुलांनी मुलांसारखंच असायला पाहिजे. लहानपणीच त्यांना प्रौढ बनवण्याची आवश्यकता नाही. मोठी माणसं अगदी चातुर्यानं गोष्टी इकडच्या तिकडं करण्याची हातचलाखी करतात. मुलाची अबोधिता विकसित करा. मुलांसमोर मिसेस मार्गारेट थॅचर किंवा दक्षिण अफ्रिका या विषयांवर चर्चा करू नका. परंतु ते चीनच्या मुलांना कसं वागवतात किंवा रशियाच्या मुलांनी कसे कपडे घातले आहेत, ह्याबद्दल त्यांच्याशी बोला. मुलं कसे कपडे किंवा पोशाख घालतात त्याचे फोटो एकमेकांकडे पाठवा. 'माझा' ह्या शब्दाकडे आणि वृत्तीकडे लक्ष ठेवा. उदाहरणार्थ, त्यांना नेहमी त्याच आसनावर किंवा जागेवर बसू देऊ नका. त्यांना म्हणायला सांगा, 'आमचे' आणि 'आम्ही'.

ह्या वयात मुलं सृजनशील असतात. उदाहरणार्थ, चित्र रंगवणं. 'आता आपण एका सहजयोग्याचं चित्र काढू या, रंगवू या', आणि शिवाय, 'आणि वाईट माणसाचं नाही. हां आता फुलं काढा.' मार्गदर्शन महत्त्वाचं! त्यांना जसं वाटलं तसं मुळीच करू द्यायचं नाही! नाहीतर नंतरच्या काळात आणि आयुष्यात दुसऱ्यांकडून ते सूचना, उपदेश घेऊ शकत नाहीत. त्यांना ते जमत नाही.

दुसऱ्यांना प्रसन्न करणं आणि इतरांशी व त्यांच्या कुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळींशी सौम्य आणि सभ्य कसं राहावं हे त्यांनी शिकलंच पाहिजे.

जर 'हे माझं आहे', म्हणून एखाद्या गोष्टीसाठी ते भांडण करीत असतील तर ती गोष्ट तुम्ही स्वत:कडे घेऊन टाका.

त्यांच्या बाह्य वर्तनात सुधारणा झाली आहे की नाही ह्याकडे लक्ष द्या. त्यांच्या चैतन्य लहरींमध्ये सुधारणा झाली आहे की नाही हे तपासून पाहा.

कदाचित हे फक्त पृष्ठभागावर आणि वरवरचं देखील असू शकतं.

शिक्षा आणि दंड - सर्वांच्यादेखत शिक्षा देऊ नका. कधीही त्यांच्यावर जोरानं ओरडू नका. त्यांना समजुतीच्या गोष्टी सांगा. त्यांना तीन वेळा पूर्वसूचना, चेतावणी द्या. मग चौथ्या वेळी त्यांना शिक्षा, दंड द्या आणि पाचव्यांदा तर इतर लोक हजर असतांना त्यांना शिक्षा द्या.

त्यांच्या लबाडीवर, धूर्तपणावर नजर ठेवा. धूर्तता किंवा चतुराई ह्यांना बिलकुल परवानगी नाही, वाव नाही. एकीकडे लबाडी असते आणि दुसरीकडे अजाण खोडी! अजाण खोडी खरंच गोड असते. लबाडी म्हणजे दुसऱ्याला जाणूनबुजून दुखावणं! चलाखी म्हणजे गमतीगमतीत केली गेलेली लबाडी! खोडकरपणा छान असतो.

परंतु त्यांनी दुसऱ्यांना भीती दाखवायला नको. उदाहरणार्थ, पाली किंवा साप, कोळी, झुरळं, डास, ढेकूण हे वाईट प्राणी आहेत, असं त्या मुलांना सांगा. पण मांजराची पिल्लं, कोंबडीची पिल्लं, कुत्रीदेखील चांगली असतात. परंतु त्यांच्या अंगावर असणारे गोचिडासारखे किडे किंवा इतर परोपजीवी जंतु, किडे वाईट आहेत हे त्यांना सांगा.

काटे फुलांचं रक्षण कसं करतात हे त्यांना सांगा, ते काटे फुलांच्या आतमध्ये तर नसतात. काटे फुलांचं रक्षण कसं करतात ह्याची कहाणी त्यांना स्पष्ट समजावून सांगा. कारण ही एक जिवंत घटना आहे.

दुसऱ्यांचाही विचार करणं आणि त्यांची काळजी घेणं, त्याचप्रमाणे जनावरं, प्राणी ह्यांचा विचार करणं आणि त्यांची काळजी घेणं ह्या गोष्टींना प्रोत्साहन द्या. लहान मुलं निरागस असतात. त्यांच्यासमोर मोठ्या लोकांचं वर्तन नैतिकच असायला हवं. एकत्र झोपणं नको आणि एकमेकांना आलिंगन देणं किंवा चुंबनादि प्रकार लहान मुलांच्यासमोर नकोतच. अगदी लवकर

वयातच त्यांना सगळ्या कल्पना येतात. नग्नता नको. जर त्यांनी आपल्या पँटीज काढल्या तर म्हणा, 'शेम, शेम, अरे, लाज वाटू द्या!' त्यांच्या डोक्यात लाज, शरम काय असते ह्याची कल्पना येऊ द्या.

जर एखादा मुलगा वाजवीपेक्षा जास्त वळवळ्या किंवा क्रियाशील असला तर त्याच्यावर इलाज करा, त्याला सांभाळा. उजवी बाजू खाली आणा. सहजयोग तंत्राचा उपयोग करा. यकृताच्या (Liver) त्रासासाठी गुलकंद फार चांगला आहे. (गुलकंद - गुलाबी रंगाच्या गुलाबाच्या पाकळ्या घट्ट होईपर्यंत साखरेबरोबर उकळायच्या.) शिवाय यकृतावर बर्फसुद्धा ठेवावा.

मुलांनी आपले दात घासायला हवेत आणि हिरड्यादेखील चोळायला पाहिजेत.

चैतन्य लहरींनी भारित पाण्याचा पिण्यासाठी उपयोग करा. साखरसुद्धा चैतन्य लहरींनी भारित असावी. सगळीकडे!

श्रीमाताजींच्या फोटोकडे पाठ करू नये हे त्यांना दाखवा. आम्ही जितके अधिक आदर दाखवणारे असू तितकाच अधिक आदर ते करतील. त्यांच्यासमोर आपण वाद घालू नये. आपण जोरात आरडाओरडा करू नये. त्यांच्यासमोर आपण शांत असायलाच पाहिजे आणि शांतता राखली पाहिजे.

जर ते छान छान, गोड, गोष्टी करायला लागले तर त्यांना सोडून द्या (लक्ष देऊ नका) नाहीतर ते स्वत:च्या बाबतीत सतर्क होतील. जर आमच्या प्रतिक्रिया फार जबरदस्त तीव्र असतील तर त्यांच्या मनाला धक्काच बसेल. त्यांना अचानक धक्का बसेल असं करू नका. लहान मुलांना असं दाखवणं, की हे जग सुखी, आनंदी आणि शांतीपूर्ण आहे, ही गोष्ट तर प्रोत्साहनाहून

अधिक आहे. तर मग ते उदास, खचलेले धैर्यहीन न होता त्यांची वाढ होईल. हिंसा दाखवणाऱ्या गोष्टी टाळा.

त्यांना तीक्ष्ण, धारदार वस्तु देऊ नये. धारदार वस्तूंच्या बाबतीत काळजीपूर्व कसं वागायचं हे त्यांना दाखवा. जसं की धातूच्या टेबलाचा कोपरा.

त्यांच्याजवळ पारदर्शी चित्र (स्लाईड्स) आणि बागेतल्या वस्तू अधिक असू द्या.

प्रेम आणि बुद्धिमत्ता ह्या दोहोंमध्ये संतुलन असायला पाहिजे.

कोणत्याही गोष्टींना प्रेमानं आणि हुशारीनं हाताळा. एखाद्या मुलाची गैरवर्तनाची चूक सुधारून त्याला ठीक करतांना बुद्धिमत्तेचा उपयोग करा. परंतु त्या मुलाला हे पक्कं माहीत असायला पाहिजे, की तुम्ही त्याच्यावर प्रेम करता.

शाळेची वास्तु सुंदर असायला पाहिजे. आजूबाजूच्या पर्यावरणातून मुलांमध्ये सौंदर्यतत्त्वाची संवेदना निर्माण होऊन विकसित होते. वास्तु कलात्मक किंवा इतर देशांच्या वास्तु रचनेला अनुसरून कलापूर्ण असू शकेल पण वातावरण मात्र धार्मिक पाहिजे.

# माझ्या फुलांसारख्या मुलांसाठी

तुम्ही जीवनावर रुष्ट आहात
जशी की लहानगी मुलं -
ज्यांची आई अंधारात हरवली आहे.

तुमचे उदास, म्लान चेहरे
दाखवताहेत दु:ख, निराशा -
कारण की तुमच्या प्रवासाचा अंत निष्फळ आहे.

सौंदर्याला शोधण्यासाठी तुम्ही तर
कुरूपताच परिधान केली.
सत्याच्या नावाखाली
तुम्ही तर प्रत्येक गोष्टीला
असत्याचं नाव देता.
प्रेमाचा पेला भरण्यासाठी
तुम्ही तर भावनांनाच
रितं करून टाकलं आहे!

माझ्या सुंदर, गोड बाळांनो, माझ्या प्रिय लेकरांनो,
युद्ध लढून तुम्हाला शांतता कशी लाभू शकेल?
युद्ध-स्वत:शी, स्वत:च्या अस्तित्वाशी
आणि स्वत:च्या आनंदाशी देखील!
पुरे झाले, आता बस करा,
हे संन्यासाचे, त्यागाचे तुमचे प्रयत्न -
जे सांत्वनाचे कृत्रिम मुखवटे आहेत!

आता कमळाच्या पाकळ्यांमध्ये
तुमच्या वत्सल, कृपाळू आईच्या कुशीत
विसावा घ्या!

मी फुलांच्या सुंदर बहरानं
तुमच्या जीवनाला सजवेन, शोभिवंत करेन.
आणि तुमचा प्रत्येक क्षण आणि जीवन
आनंदाच्या आमोदानं दरवळून टाकेन.
मी मस्तकावर तुमच्या
दिव्य प्रेमाचा अभिषेक करेन!
तुमच्या यातना आता
मला अधिक सहन नाही करता येत.
मला तुम्हाला प्रेमाच्या महासागरात डुंबवू देत
ज्यामुळे तुम्ही तुमचं अस्तित्व
अधिक महान असणाऱ्या 'एका'मध्ये विरघळवून टाकेन!
जो तुमच्या आत्म्याच्या कळीच्या कोशातून
मंद हास्य करतो आहे
आणि तुम्हाला सारखं सारखं चिडवायला
तो गुपचूप लपला आहे - तुमच्यातच!
जरा जाणीव होऊ द्या, भानावर या.
आणि तुम्ही त्या 'महान'ला शोधू शकाल.
तुमच्या कणाकणात, तंतू तंतूत, नसा-नसांमध्ये
परमानंदाच्या सुखानं स्पंदित करतो आहे तो!
आणि संपूर्ण विश्वाला प्रकाशानं व्यापून, लपेटून
झाकून टाकत आहे तो!

**- आई निर्मला**

## सर्वाधिकार सुरक्षित

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाची दुसरी आवृत्ती किंवा कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा विविध माध्यमांमध्ये रूपांतर जसे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, झेरॉक्स, पुनर्मुद्रण हे पूर्व परवानगीशिवाय करू नये.

visit us at www.sahajayoga.org to know more about Sahaja Yoga.